# साने गुरुजी यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास

**(Sane guruji yanchya nivadak kadambaryancha abhyas)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**कुलदीप दिलीप सावंत**

हजेरी क्र. 22P0190013

ABC ID 308418424674

पी. आर 201910324

मार्गदर्शक

**चिन्मय मधू घैसास**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# SANE GURUJI YANCHYA NIVADAK KADAMBARYANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTAkTION


**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

## Kuldeep Dilip Sawant

Seat No: 22P0190013
ABC ID: 308418424674
PRA: 201910324

Under the supervision of

**Chinmay Madhu Ghaisas**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**
**2023 – 2024**

# DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "साने गुरुजी यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Asst. Pro. Chinmay Madhu Ghaisas and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

(Kuldeep Dilip Sawant)

Signature and Name of Student

Seat no: 22P0190013

Date: 16/04/2024

Place: Goa University

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "**साने गुरुजी यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास**" is a bonafide work carried out by **Mr Kuldeep Dilip Sawant** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

Chinmay Madhu Ghaisas

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16/04/2024

Signature of Dean of the School/ HOD of Dept

School/Dept Stamp

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Date: 16/4/2024

Place: Goa University

# मनोगत

मराठी विषयात पदव्युत्तर पदवीचा अभ्यास करताना ‘विशिष्ट लेखकाचा अभ्यास’ हा अभ्यासक्रमातील एक विषय होता. त्यावेळी स्वाध्यायाकरिता साने गुरुजी या विशिष्ट लेखकाचा अभ्यास मी केला होता. परंतु हा अभ्यास खूपच संक्षिप्त स्वरूपाचा होता. हा अभ्यास करत असतानाच साने गुरुजींच्या साहित्याकडे आकर्षण निर्माण झाले होते. म्हणूनच द्वितीय वर्षाच्या संशोधन प्रबंधिकेसाठी मी साने गुरुजींच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करायचे ठरविले.

प्रस्तुते संशोधन प्रबंध  माझ्या हातून लिहिले गेलेले पहिलेच संशोधनपर कार्य आहे. हे संशोधन करत असताना खूप मेहनत घ्यावी लागली. परंतु संशोधन कार्य पूर्ण झाल्यानंतर मिळालेला आनंद हा त्याहून अधिक महत्त्वाचा आहे. माझ्या आई वडिलांच्या व इतर वडीलधाऱ्या माणसांच्या आशिर्वादामुळेच मी हे शोध प्रबंधिकेचे कार्य पूर्ण करू शकलो आहे. फक्त आशीर्वादच नाही तर माझ्या कुटुंबीयांकडून मला खूप मोलाची मदतही झालेली आहे. मला वेळ मिळत नसल्यामुळे काही छापण्याचे कार्य असो अथवा काही महत्त्वाची पुस्तके उपलब्ध करून देण्याचे कार्य असो, या सारखी महत्त्वाची मदत माझ्या भाऊ बहिणीने मला केली.  याच कारणामुळे संशोधन प्रबंधिकेच्या मनोगतात माझ्या कुटुंबाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे भाग्य समजतो.

शोध प्रबंधिकेतील संशोधनाचा मार्ग हा पहिल्याच वेळी संशोधन करणाऱ्यासाठी सोपा नसतो. ह्या मार्गावर चालण्यासाठी मार्गदर्शकाची आवश्यकता असते. हे संशोधन करण्यासाठी मला प्राध्यापक चिन्मय मधू घैसास हे मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांनी वेळोवेळी मला प्रोत्साहन तर दिलेच पण त्याचबरोबर माझ्या चुकाही दाखवून दिल्या. मराठी अध्ययन शाखेतील डॉ. सुनिता उम्रजकर मॅडम, प्रा. विनायक बापट सर, डॉ. विनय मडगांवकर सर, डॉ. हेमंत

अय्या सर, प्रा. जयेश गावकर सर आणि प्रा. पूर्वा वस्त मॅडम हे शिक्षक या संशोधन प्रबंधिकेचे मार्गदर्शक जरी नसले तरीही वेळोवेळी त्यांनी मला मदत केली आहे. संशोधन प्रबंधिकेच्या एकूण अभ्यासात निर्माण झालेल्या समस्यांचे निरसन करण्यात त्यांचाही मोलाचा वाटा आहे. मला मिळालेल्या योग्य मार्गदर्शनामुळे मी हा संशोधनाचा प्रवास पूर्ण करू शकलो आहे. म्हणून मी माझे मार्गदर्शक प्राध्यापक चिन्मय मधू घैसास व मराठी अध्ययन शाखेतील इतर सर्व शिक्षकांप्रती माझी कृतज्ञता व्यक्त करतो.

ही संशोधन प्रबंधिका पूर्ण होण्यासाठी माझ्या मित्रमंडळींचा खूप मोलाचा वाटा आहे. काही तांत्रिक अडचणी दूर करून देणे अथवा संदर्भाची पुस्तके घेण्यासाठी स्वतःचे वाचनालयाचे कार्ड उपलब्ध करून देणे यासारख्या अनेक मदती माझ्या मित्र-मैत्रिणींमुळे झाल्या. ह्याशिवाय मला प्रोत्साहन देण्याचे काम देखील त्यांनी केले. मी माझे सर्व मित्र-मैत्रिणी प्रति कृतज्ञता व्यक्त करतो.

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | प्रकरणे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तावना | 1 |
| ०२ | संशोधन प्रबांधिकेच्या प्रस्तावातील महत्त्वाचे मुद्दे | 3 |
| ०३ | प्रकरण १ : विशिष्ट लेखकाचा अभ्यास – स्वरूप आणि संकल्पना | 6 |
| ०४ | प्रकरण २ : कादंबरी – स्वरूप आणि संकल्पना | 18 |
| ०५ | प्रकरण ३ : साने गुरुजींच्या कादंबऱ्यांची घटकानुरूप चिकित्सा | 33 |
| ०६ | प्रकरण ४ : साने गुरुजींच्या कादंबरीतील वैचारिकता | 70 |
| ०७ | प्रकरण ५: समारोप आणि निष्कर्ष | 83 |
| ०८ | संदर्भसूची | 90 |

# साने गुरुजी यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास

## प्रास्ताविक

पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी हे स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी साहित्याला समृद्ध करणारे व्यक्तिमत्व होते. ज्या फडके खांडेकर युगात साहित्याचे प्रयोजन काय या गोष्टीवर वाद होत होते त्याच काळात सा1ने गुरुजींनी कादंबरी लेखन सुरू केले.

१९२० व नंतरच्या काळातील कादंबरी प्रामुख्याने रंजक स्वरूपाची होती. तरी पहिले महायुद्ध, रशियातील साम्यवादी क्रांती यासारख्या महत्त्वाच्या घटनांमुळे काही लेखकांची कादंबरी वास्तवाकडे जाऊ लागली. 1930 च्या काळात गरीब श्रीमंत संघर्ष, गुलामगिरी विरुद्ध बंड, स्त्री स्वातंत्र्य यासारखे विषय असलेल्या व सामाजिक मुद्दे हाताळणाऱ्या कादंबऱ्या प्रकाशित होऊ लागल्या. परंतु या कादंबरींचा समाज प्रामुख्याने पांढरपेशी सुशिक्षित मध्यमवर्गीय स्वरूपाचा होता. १९३५ मध्ये साने गुरुजी यांची श्यामची आई ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली व पुढे क्रमशः याच कालखंडात त्यांच्या इतर सर्व कादंबऱ्या प्रकाशित होत गेल्या.

साने गुरुजी एक समाजसेवक व कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध होते. एक लेखक म्हणून सुद्धा त्यांना वैचारिक साहित्यिक व बाल साहित्यिक अश्या खूप वेगवेगळ्या टोकाची प्रसिध्दी प्राप्त आहे. पण साने गुरुजींनी मात्र विपुल साहित्याची निर्मिती केली आहे. कथात्म साहित्याचा विचार केल्यास त्यांच्या कथा, बाल वयोगटासाठी लिहिलेल्या आहेत. कादंबरी सारखा कथात्म प्रकारही त्यांनी हाताळला. त्यांचे पहिलीच आत्मकथनपर स्वरूपाची श्यामची आई जितकी लोकप्रिय झाली तितकी लोकप्रियता त्यांच्या इतर कादंबऱ्यांना प्राप्त झाली नाही.

साने गुरुजींनी एकूण एकोणीस कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ज्यातील निवडक अकरा कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास संशोधन प्रबंधिकेत केला आहे. ह्या सर्व कादंबऱ्यात पूर्णतः त्यांच्या कल्पनाबिव्यक्तीचा आविष्कार झाला आहे. चार कादंबऱ्यांना साने गुरुजींचे आत्मचरित्रपर स्वरूप प्राप्त झाले आहे व तीन कादंबऱ्या दुसऱ्या भाषेतील कादंबऱ्यांचे भाषांतर व स्वैर अनुवाद आहेत. त्याच प्रमाणे एक कादंबरी ही पौराणिक स्वरूपाची आहे. ही माहिती त्या त्या पुस्तकांच्या प्रस्तावनेत साने गुरुजींनी स्पष्ट केली आहे. ह्या कादंबऱ्यांचा  संशोधन प्रबांधिकेत अभ्यास झालेला नाही. स्वतःच्या आयुष्याचा पट व दुसऱ्या लेखकांच्या कल्पनेतील कथाविश्र्व असलेल्या कादंबऱ्या वगुळन निवडक अकरा कादंबरींची चिकित्सा प्रबंधिकेत करावयाची आहे. ह्या अक्रही कादंबऱ्या सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या आहेत.

हे संशोधन एका विशिष्ट लेखकाचे व त्याचबरोबर विशिष्ट साहित्यप्रकाराचे असल्यामुळे या संशोधनाच्या अभ्यासासाठी संशोधन क्षेत्रातील लेखकनि1ष्ट संशोधन व साहित्यप्रकारनिष्ट संशोधन या दोन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. लेखकनिष्ट व प्रकारनिष्ट संशोधन म्हणत असताना या दोन्ही क्षेत्रातील संशोधनासाठी लागणारे नियम व निकष  प्रबंधिकेसाठी लागू पडले आहेत. म्हणून सर्वप्रथम विशिष्ट लेखकाचा अभ्यास व विशिस साहित्य प्रकारचा अभ्यास म्हणजे काय? त्याचे स्वरूप आणि संकल्पना यांचे विवेचन होणार आहे.

## संशोधन प्रबंधिकेच्या प्रस्तावातील महत्त्वाचे मुद्दे

### १. संशोधन विषयक समस्या

समग्र मराठी कादंबरी व मराठी कादंबरीची वाटचाल या दृष्टीने विचार करत असताना साने गुरुजींच्या कादंबऱ्यांचा आवश्यक तेवढा विचार केला जात नाही. मराठी कादंबरीच्या वाटचालीत व इतिहासात एक कादंबरीकार म्हणून साने गुरुजींचे व त्यांच्या कादंबरीचे स्थान निश्चित होणे आवश्यक आहे.

साने गुरुजींच्या कादंबरी साहित्याला केंद्रस्थानी ठेवून समीक्षा व मुख्यतः संशोधन होणे गरजेच आहे. कादंबरींची चिकित्सा झाल्याशिवाय लेखकाचे व त्याच्या कादंबरीचे एकूण साहित्याच्या इतिहासात स्थान निश्चित करणे कठीण आहे.

### २. संशोधनकार्याची उपयुक्तता/आवश्यकता

एक साहित्यिक म्हणत असताना एका लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास होणे आवश्यक असतो. परंतु साने गुरुजींच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास त्यांच्या इतर लेखनाच्या तुलनेत झालेला दिसत नाही. साने गुरुजी ज्या काळात कादंबरी लेखन करत होते त्या काळात कादंबरीतील रंजकतेला खूप महत्त्व होत. आणि कदाचित प्रस्थापित प्रवाहाविरुद्ध लेखन केले याच कारणामुळे साने गुरुजींच्या कादंबरीला तत्कालीन इतर कादंबऱ्यांपेक्षा कमी महत्त्व प्राप्त झाले.

जे साने गुरुजी वैचारिक साहित्य लिहिण्यासाठी प्रसिद्ध आहेत त्यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास सुद्धा फक्त घटकानुसार न होता कादंबरीत कशाप्रकारे त्यांच्या वैचारिकतेचा प्रभाव पडला आहे यानुसार होणे महत्त्वाचे आहे.

साने गुरुजींच्या कादंबरीतून व्यक्त होणारे तत्वज्ञान आजच्या काळातील  परिस्थितीसाठी किती प्रभावी ठरू शकते हे ह्या प्रबंधिकेतून स्पष्ट होईल.

## ३. संशोधनकार्यामागची उद्दिष्टे

- साने गुरुजींच्या कादंबरीचे स्वरूप समजून घेणे.
- कालानुरूप कादंबरी लेखनातील आशय व अभिव्यक्तीत होणारे बदल व परिवर्तन पडताळून पाहणे
- कादंबरी लेखनावर पडलेला साने गुरुजींच्या सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जाणून घेणे.
- कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या नीती मूल्यांचा आढावा घेणे.
- लेखनाचा काळ व कादंबरीची उपयुक्तता यांच्या सहसंबंध तपासणे.

## ४. गृहितकांची मांडणी

- साने गुरुजींच्या कादंबरी लेखनावर गांधीवादाचा प्रभाव आहे.
- साने गुरुजींनी संस्कार व नीती-मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लेखन केले आहे.
- देशकार्य व समाजकार्य हेच कादंबरी लेखनाचे प्रयोजन आहे.

- कादंबरीच्या माध्यमातून ग्रामीण व कष्टकरी समाजाचे जीवन दिसते. तसेच या समाजाला संघटित करण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे.
- साने गुरुजींची तत्त्वज्ञान कालातीत आहे. आजच्या काळातील राष्ट्रीय वैश्विक राजकारणात संतुलन आणू शकते.
- साने गुरुजींच्या कादंबरीतील सगळीच प्रमुख पात्रे ही ध्येयवादी व आदर्शवादी असतात.

## ५. संशोधन पद्धती

- वर्णनात्मक पध्दती

साने गुरुजी यांच्या निवडक कादंबरीचा अभ्यास या संशोधन प्रबंधिकेसाठी अभ्यासली जाणारी संशोधन साधन-सामग्री ह्या कादंबऱ्या आहेत. ह्या कादंबरीचे वाचन व आकलन करून त्यावरील समालोचन, चिकित्सा व विवेचन वस्तुनिष्ठ स्वरूपाच वर्णनात्मक पद्धतीने केले जाणार आहे.

# प्रकरण १ :

# विशिष्ट लेखकाचा अभ्यास – स्वरूप व संकल्पना

**अनुक्रमणिका**


१.१ प्रस्तावना........................................................................................ 7

१.२ लेखकाभ्यासातील मार्गदर्शक तत्व.................................................................. 7

१.२.१ व्यक्तिमत्त्व आणि जीवन.......................................................................... 7

१.२.२ देश, काळ व परिस्थिती.......................................................................... 8

१.२.३ वाङ्मयीन वातावरण.............................................................................. 9

१.२.४ लेखकाने हाताळलेले वाङ्मयप्रकार............................................................... 10

१.२.५ लेखकाची मूल्ये आणि वैचारिक दृष्टिकोन...................................................... 11

१.२.६ साहित्यातील आशयाचे स्वरूप..................................................................... 12

१.२.७ स्थाननिश्चिती.................................................................................... 13

१.३ अभ्यासाचा दृष्टिकोन.............................................................................. 14

१.३.१ समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून..................................................................... 14

१.३.२ ऐतिहासिक दृष्टिकोनातून......................................................................... 15

१.३.३ तुलनात्मक दृष्टिकोनातून.......................................................................... 15

१.४ समारोप............................................................................................. 15

१.५ निष्कर्ष............................................................................................... 16

१.६ संदर्भ सूची........................................................................................... 17

## १.१ प्रस्तावना

विशिष्ट लेखकाचा अभ्यास किंवा लेखकनिष्ठ अभ्यास हा वांङ्मयाच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा संशोधन विषय बनला आहे. पीएचडी, शोध प्रबंध सारख्या संशोधनांच्या माध्यमातून वेगवेगळ्या लेखकांचा अभ्यास होताना दिसतो. हे लेखक कुठल्याही काळातील असू शकतात. हा अभ्यास परिपूर्ण होण्यासाठी त्यात चिकित्सकता आणि शिस्तबद्धता येण्यासाठी, तसेच ते संशोधन परिपूर्ण ठरण्यासाठी काही पद्धतींचा उपयोग करावा लागतो. विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा संशोधनाचा फार मोठ्या प्रमाणात घेतला जाणारा विषय आहे. तरीही विशिष्ट लेखकाचा अभ्यास कसा करावा यासंबंधी सिद्धांतिक पातळीवरील लेखन मराठी मध्ये खूप कमी प्रमाणात झालेले दिसते. संशोधनाचे स्थर वाढवण्यासाठी कोणत्या बाबी कडे लक्ष द्यावे, कशाप्रकारे हा अभ्यास पूर्ण करावा यासंबंधीत संशोधकांना मार्गदर्शक पर सिद्धांतिक मांडणी करणे आवश्यक आहे.

हा अभ्यास लेखकाचे साहित्य आणि लेखकाचे जीवन अशा दोन अंगांचा समांतर पद्धतीने अभ्यास करूनच होत असतो. असा अभ्यास करत असताना काही ठराविक बाबींकडे आवर्जून लक्ष देणे महत्त्वाचे असते.

## १.२ लेखकाभ्यासातील मार्गदर्शक तत्वे

### १.२.१ व्यक्तिमत्त्व आणि जीवन

लेखकाने निर्माण केलेल्या साहित्याला त्याच्या जीवनाचा आरसा अथवा त्याचे आत्मचरित्र म्हणता येते. असे म्हणण्याचे कारण म्हणजे लेखक जे जीवन जगत असतो, जे व्यक्तिमत्व त्याचे घडलेले असते त्याचे पडसाद त्याच्या

साहित्यातून उमटत असतात. म्हणूनच लेखकाचे व्यक्तिमत्व आणि जीवनाचा त्याच्या साहित्याची अन्यन्यसाधारण संबंध असतो. लेखकाचे लौकिक व अलौकिक चरित्र समजून घेणे आवश्यक ठरते. लेखकाचे बालपण कसे गेले, लेखकाचे कुटुंब आणि कौटुंबिक जीवन कसे होते, त्यांच्या नंतरच्या जीवनात येणाऱ्या, महत्त्वाच्या व लक्षणीय घटना-प्रसंग या सर्वांचा शोध एकूण लेखकाची माहिती व जीवन समजत असताना घेणे आवश्यक असते. लेखकाला आयुष्यात ज्या प्रकारचे अनुभव येतात त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्व घडते व त्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या साहित्यावर परिणाम होतो. ज्या व्यक्तींच्या सान्निध्यात लेखक असतो किंवा जे व्यक्ती लेखकाच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान बजावत असतात उदाहरणार्थ आई, वडील, पती, पत्नी, मित्र, शिक्षक, एखादा प्रभावी लोकनेता या सगळ्यांच्या प्रभावातून लेखक घडतो त्याच्यावर संस्कार होतात. त्याच्या उपजत मनःप्रवृत्ती वर होणारा परिणामातून लेखकाचे व्यक्तिमत्व आकाराला येते. याच व्यक्तिमत्त्वाच्या त्याच्या साहित्याची संबंध खूप निकटचा संबंध असतो. लेखकाच्या जीवनानुभवातूनच त्याचे साहित्य निर्माण होते म्हणून विशिष्ट लेखकाचा अभ्यास करत असताना त्याच्या संपूर्ण जीवनाची आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाची माहिती संशोधनासाठी खूप उपयोगी ठरते. लेखकाचे जीवन आणि त्याचे व्यक्तिमत्व समजत असतानाच त्याच्या साहित्याशी असलेला संबंध अभ्यासकाला शोधावा लागतो.

### १.२.२ देश, काळ व परिस्थिती

लेखक ज्या प्रदेशात व काळात जन्माला येतो त्या प्रदेशात व त्या काळातील परिस्थितीत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. जडणघडणीचा काळ आणि त्याच्या लेखनाचा काळ या दोघांचा अभ्यास एका विशिष्ट लेखकाचा अभ्यास करत असताना करणे अपेक्षित असते. "लेखक अधांतरी किंवा कोणत्या तरी पोकळीत

वावरत नसतो. तो कोणत्या तरी देशात, काळात, समाजात आणि आर्थिक, राजकीय, सामाजिक- सांस्कृतिक परिस्थितीत जगत असतो.[१] सगळ्याच परिस्थिती लेखकाच्या आवडीच्या असतात असे नाही. परिस्थितीनुसारच वेगवेगळ्या प्रतिमात्मक जाणीवा त्याच्या मनात निर्माण होत असतात. ज्या जगात तो वावरतो त्या जगातील वेगवेगळ्या समस्यांचे, स्थित्यंतरांचे अवस्थांचे पडतात नकळतपणे तिच्या मनावर उमटतात. भोवतालच्या परिस्थितीपासून लेखक स्वतःला आणि निर्माण केलेल्या साहित्याला अलिप्त ठेवू शकत नाही. विशिष्ट अशी परिस्थिती प्राप्त होण्यामागे देश आणि काळ हे घटक कारणीभूत असतात. देशाची विशिष्ट काळात असलेली संस्कृती परंपरा त्या काळाचा युगधर्म काय हे समजून घ्यावे लागते. म्हणूनच देश काळ व परिस्थिती कुठल्याही लेखकाला विशिष्ट स्वरूप प्राप्त करून देत असतात. याच कारणामुळे लेखकनिष्ठ अभ्यास करत असताना देश, काळ व परिस्थिती या घटकांच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान असते.

### १.२.३ वाङ्मयीन वातावरण

विशिष्ट लेखकाचा अभ्यास करत असताना त्या विशिष्ट लेखकाच्या जडणघडणीच्या काळातील आणि त्याच्या लेखनाच्या काळातील वाङ्मयीन वातावरण कसे होते हे समजून घेणे आवश्यक असते. वाङ्मयाचा इतिहास पाहत असताना एक गोष्ट सहज समजते ती म्हणजे वेगवेगळ्या काळानुसार वाङ्मयीन प्रवृत्ती, वाङ्मय प्रकार, विचार प्रवाह, अभिरुची, अभिव्यक्तींच्या लकबी ह्या बदलत असतात. काही ठराविक लेखकांचा इतर लेखकांवर प्रभाव पडतो. काही साहित्यप्रकार विशिष्ट काळातच लोकप्रिय होतात. नवीन साहित्यप्रवाह जन्माला येतात त्यानुसार वाङ्मयाचा आशय, विषय, अविष्कार आणि अभिव्यक्तीच्या तऱ्हा, नवीन शब्द-प्रतिमा लेखनात येऊ लागतात. याच वाङ्मयीन

वातावरणाचा प्रभाव लेखकावर होत असतो. हे वाङ्मयीन वातावरण निर्माण होण्यामागे देश, काळ व परिस्थिती या घटकाचे महत्त्वाचे स्थान असते.

समकालीन व पूर्वकालीन लेखकांचा प्रभाव आपण अभ्यासात असलेल्या लेखकावर जर पडत असेल तर या घटकालाही वाङ्मयीन वातावरणाअंतर्गत अभ्यासता येऊ शकते. उदाहरणादाखल केशवसुत, मर्ढेकरांसारखे कवी फक्त मोठे कवी नव्हते तर ते थोर व युगप्रवर्तक कवी होते. त्यांच्या प्रभावातून समकालातच नव्हे तर उत्तरकालातसुद्धा त्यांच्या प्रभावाने अनेक लेखकांनी लेखन केले. अशा एखाद्या युगप्रवर्तक लेखकाचा आपण अभ्यासत असलेल्या लेखकावर परिणाम झाला आहे का याचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते.

## १.२.४ लेखकाने हाताळलेले वाङ्मयप्रकार

एका लेखकाचा अभ्यास करत असताना त्या लेखकाने कोणकोणते वाङ्मयप्रकार हाताळलेले आहेत याचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. काही लेखक आयुष्यभर निष्ठेने फक्त एकच वाङ्मयप्रकारत साहित्य निर्माण करतात तर काही लेखक हौस, व्यवहारिक फायदा यासारख्या इतर कारणामुळे वेगवेगळे वाङ्मयप्रकार हाताळताना दिसतात. कुठल्याही लेखकाने एखादा वाङ्मयप्रकार का हाताळला आहे याचा आधी तपास करावा लागतो. गोमंतकीय कवी शंकर रामाणी हे कवी म्हणून प्रसिद्ध झाले व त्यांनी आयुष्यभर तोच प्रकार हाताळला. मात्र या उलट बा. भ. बोरकर सारखे लेखक कवी म्हणून प्रसिद्ध असताना त्यांनी कथा, कादंबरी, निबंध यासारखे इतर वाङ्मयप्रकारही हाताळले. तर ते वाङ्मयप्रकार हाताळण्यामागे त्यांची काय भूमिका होती, तसेच वेगवेगळ्या साहित्यप्रकारांमध्ये कुठल्या

साहित्यप्रकारात त्यांची अभिव्यक्ती उत्कृष्टपणे होते, कुठल्या वाङ्मय प्रकाराचे लेखन गुणात्मक दृष्टीने उत्तम व दर्जेदार आहे याचाही विचार करावा लागतो. प्रत्येक वाङ्मय प्रकाराला एखादे तंत्र असते. वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारांचे लेखन करत असताना लेखकाने त्या वाङ्मय प्रकाराचे तंत्र सांभाळून लेखन केले आहे का? याचाही विचार करावा लागतो. आणि विविध वाङ्मयप्रकार हाताळणाऱ्या एका लेखकाचा प्रकृती धर्म कुठल्या वाङ्मय प्रकाराशी चांगल्या रीतीने जुळतो हे निश्चित करावे लागते. यासाठी पूर्वतयारी म्हणून लेखकाने हाताळलेल्या प्रत्येक साहित्य प्रकाराची सैद्धांतिक माहिती असावी लागते .

## १.२.५ लेखकाची मूल्ये आणि वैचारिक दृष्टिकोन

लेखक आपल्या साहित्यात अनुभवांचा तसेच स्वतःला जाणवलेल्या जीवनाचा अर्थ प्रकट करण्याचा प्रयत्न करत असतो. अर्थ प्रकट करण्यामागे काहीतरी एक दृष्टिकोन असलेला दिसून येतो. हा दृष्टिकोन काही मूल्यांच्या व विचारधारेच्या आधारावर निर्माण झालेला असतो. काही मूल्ये त्यांनी स्वतः निर्माण केकेली असू शकतात पण ती मूल्ये त्याच्यात परिपूर्ण एकरुप झालेले असली तर काही मूल्ये लेखक जाणीवपूर्वक स्वीकारून आपल्या साहित्यातून व्यक्त करत असतो. किंबहुना त्यांचा प्रचारही करू शकतो. या मूल्यांचा त्याच्या साहित्याच्या स्वरूपावर होत असतो. म्हणून कुठल्याही लेखकाचा व त्याच्या साहित्याचा अभ्यास करत असताना त्यातून व्यक्त होणारा मूल्यात्मक दृष्टिकोनचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते.

उदाहरणार्थ बा.भ बोरकर हे गांधीवादी विचारांचे होते. त्यांच्या कादंबऱ्यातील काही पात्रे गांधीवादी विचारधारेतून निर्माण झालेली असतात. पण या विचारधारेचा त्यांच्या साहित्यावर खूप मोठ्या प्रमाणाने परिणाम होत नाही. याच्या दुसऱ्या बाजूला साने गुरुजी हे देखील गांधीवादी विचारधारेचे उपासक होते. त्यांच्या साहित्यकृतीतील देखील व्यक्तीचित्रणे घटना प्रसंगांची चित्रे गांधी वादातून निर्माण झालेली असतात. त्यांच्या साहित्यातून निर्माण झालेली सगळीच पात्रे सद्भाव प्रकट करणारी का असतात? सगळ्यांच्यात देशभक्ती का असते? असा प्रश्न वाचकाला पडू शकतो व ते वाचकाला खटकू शकते. म्हणूनच कुठल्याही लेखकाच्या वैचारिक व मूल्यात्मक दृष्टिकोनाचे त्याच्या साहित्यावर होणाऱ्या भल्या भल्या परिणामंचा अभ्यास संशोधकाला करणे महत्त्वाचे असते. मूल्यात्मक दृष्टिकोन साहित्यकृतीतील आशयाला सगनता देत असतो पण काही वेळा तो साहित्यकृतीचे स्वरूप साचेबंद करू करू शकतो. या कारणामुळे साहित्यातील मूल्यात्मक व वैचारिक दृष्टिकोन आहे समजून घ्यावा लागतो उदाहरणार्थ जर एका साहित्यिकाच्या साहित्यातून मार्क्सवादाचा प्रचार होताना दिसतो तर त्या साहित्याला अभ्यासण्यासाठी आधी मार्क्सवाद म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक ठरेल.

## १.२.६ साहित्यातील आशयाचे स्वरूप

लेखकाच्या साहित्यकृतीतून त्याने अनुभवलेल्या जीवनाचा आविष्कार होत असतो. म्हणूनच एका लेखकाचा अभ्यास करत असताना त्याच्या साहित्यातून प्रकट होणाऱ्या जीवन चित्राचा अभ्यास करावाच लागतो. लेखक एखाद्या कवी आहे तर त्याच्या कवितेतून निर्माण होणाऱ्या भावना व जाणीवांचे स्वरूप उलगडावे लागते. त्याच्या कवितेतून

निर्माण झालेले भावविश्व कशा स्वरूपाचे आहे तसेच कवितेत प्रकट झालेल्या संवेदना विचार व भावना यांचे स्वरूप काय आहे हे समजावे लागते.

विशिष्ट लेखकाच्या साहित्याच्या अभ्यास करत असताना त्यात निर्माण झालेले जीवनचित्र अनेक दृष्टीने अभ्यासावे लागते कादंबरी सारख्या साहित्य प्रकाराचा पट खूप मोठा व व्यापक असतो. समाजजीवनाचे सखोल, व्यापक व अनेकांगी दर्शन कादंबरी घडवत असते. म्हणूनच एका लेखकाचा अभ्यास करताना त्याने त्याच्या साहित्यात साकारलेले अनुभवविश्व किती मोठे आहे, त्याची व्याप्ती काय आहे, याचा विचार करावा लागतो. साहित्यात निर्माण झालेले जीवनदर्शन तत्कालीन कालखंडाच्या समांतर जाणारे आहे का नाही याचा विचार करावा लागतो. की त्या चाकोरी बाहेर जाऊन लेखकाने काही नवीन निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे याचा विचार करावा लागतो लेखकांनी समाज जीवनाचा विविध कशा प्रकारे घेतला आहे याचा अभ्यास करावा लागतो. लेखक आपल्या साहित्यात वास्तविक जीवनाचे चित्रण करू शकतो किंवा फक्त कल्पनांच्या जगात रमू शकतो. तर त्याच्या साहित्याचे स्वरूप कशा प्रकारचे आहे याचा वेध अभ्यासकाला घेणे आवश्यक असते.

## १.२.७ स्थाननिश्चिती

वरील सर्व मुद्द्यांच्या अभ्यासातून लेखकाचे एकूण वाङ्मय इतिहासात काय स्थान आहे हे समजत असते पण तरीही एक  निष्कर्षरूपी विधान करण्यासाठी लेखकाची स्थानिक किती करणे आवश्यक असते प्रत्येक लेखक हा वेगळा असतो तो आपल्या साहित्याच्या माध्यमातून एकूण साहित्यविश्वात केवळ संख्यात्मकच नव्हे तर गुणात्मक भर

घालत असतो प्रत्येक लेखकाच्या साहित्यातून साहित्यविश्वाच्या अनुभव क्षेत्राची व्याप्ती होत असते अशातऱ्हेने प्रत्येक लेखक साहित्याच्या परंपरेला समृद्ध करण्याचे काम करतो. याच कारणामुळे प्रत्येक लेखकाचे वांङ्मय इतिहासातील स्थान निश्चित करणे महत्त्वाचे असते. हे स्थान निश्चित करणे सोपे नसते. अनेक वेळा धाडसी विधान करावे लागते पण म्हणून अभ्यासक ते टाळू शकत नाही.

## १.३ अभ्यासाचा दृष्टिकोन

वरील सर्व मुद्द्यांच्या आधारातून विशिष्ट लेखकाचा अभ्यास करण्यासाठी लागणारी सर्व मार्गदर्शक तत्वे समजतात.  विशिष्ट लेखकाचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टिकोनातून होऊ शकतो. प्रत्येक अभ्यासकाला आपण कुठल्या दृष्टिकोनातून अभ्यास करायचा आहे की एकापेक्षा अधिक दृष्टिकोनांचा वापर करून अभ्यास करायचा आहे याची आधी निश्चिती करावी लागते. हे पूर्णतः अभ्यासाच्या स्वरूपावर आणि अभ्यासाकावर अवलंबून असते.

### १.३.१ समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून

साहित्य आणि समाज यांच्यात अनन्यसाधारण महत्व असते. कुठलीही साहित्यकृती  समाजाचे अपत्य असते. तत्कालीन सामाजिक वातावरणाचे लेखकावर व त्याच्या साहित्यावर परिणाम होत असतो. समाज आणि साहित्य यातील याच संबंधामुळे विशिष्ट लेखकाचा अभ्यास  समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून होऊ शकतो.

### १.३.२ ऐतिहासिक दृष्टिकोनातून

जशी कुठलीही साहित्यकृती विशिष्ट समाजाचे अपत्य असते तशीच प्रत्येक साहित्यकृती कुठल्यातरी काळाची पत्य असते. तर त्या साहित्यकृतीतील काळ आणि साहित्यकृती यांच्यातील संबंध सिद्ध करण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनातून देखील अभ्यास होऊ शकतो. तसेच लेखकाचा काळ आणि साहित्याकृतीतील काळ यांच्यातील संबंध तपासणे अभ्यासाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे ठरते.

### १.३.३ तुलनात्मक दृष्टिकोनातून

एका विशिष्ट लेखकाचा अभ्यास तुलनात्मक दृष्टिकोनातून दुसऱ्या एका लेखकाशी तुलना करण्यासाठी होऊ शकतो. दोन लेखकामधील समान गुणधर्म तसेच वेगळेपण स्पष्ठ करण्यासाठी तुलनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करावा लागतो. दोन लेखकांची तूलना करण्यासाठी काळ, हाताळलेला साहित्यप्रकार, हाताळलेले विषय ह्यासारखे काहीतरी साम्य निकष असले पाहिजे.

## १.४ समारोप

प्रस्तुत प्रकरणात विशिष्ट लेखकाचा अभ्यास करण्यासाठी लागणाऱ्या सैद्धांतिक मांडणीचा अभ्यास केला आहे. तत्कालीन समाज काल व परिस्थितीचा त्याच्यावर आणि त्याच्या साहित्यावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करावा लागतो. लेखकाच्या ठाई असलेल्या वैचारिक मुल्यांचा त्याच्या साहित्यावर प्रभाव पडत असतो. साहित्यइतिहासात लेखकाचे स्थान निश्चित करणे हे ह्या अभ्यासामागचे प्रयोजन असू शकते.

## १.५ निष्कर्ष

- विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा साहित्य अभ्यासातील महत्त्वाचा संशोधन विषय आहे
- लेखक आपल्या व्यक्तिगत जीवनाला साहित्य लेखानापासून वेगळे होऊ शकत नाही. व्यक्तीगत आयुष्याचे पडसाद कमी जास्त प्रमाणात साहित्यातून उमटत असतात.
- विशिष्ट लेखकाच्या अभ्यासांतर्गत लेखकाचे जीवनचरित्र आणि त्याचे साहित्य या दोन्ही घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.
- लेखकाच्या जीवन चरित्राचा अभ्यास करताना तत्कालीन समाज, संस्कृती, राजकारण इत्यादि महत्त्वाच्या घटकांचाही अभ्यास करावा लागतो.
- लेखकाच्या अभ्यासाला वाङ्मय इतिहास आणि लेखकाने हाताळलेल्या साहित्यप्रकारांचे सांकल्पनिक माहितीचे भान असावे लागते.
- लेखकाचा अभ्यास सामाजिक, ऐतिहासिक आणि तुलनात्मक या सारख्या दृष्टिकोनातून होऊ शकतो.

# १.६ संदर्भ सूची

## संदर्भ

[१] कवठेकर बाळकृष्ण. साहित्याचा अभ्यास गुरुवर्य डॉ. र. बा. मंचरकर सद्भावः ग्रंथ (संपा. समिति : जोशी चं. वि., उपाध्ये बाबुराव, देशमुख लता, ढोणे एकनाथ, शेंडगे बाबासाहेब, वडमारे राजेंद्रकुमार, पवार संतोष पद्माकर, गंधारे दत्तात्रय, राऊत रामचंद्र, चंद्रकांत रुद्राक्षे) अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन पहिली आवृत्ती २००३. पृ. ६६

कराड सर. संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती, (संपा.  शेळके भास्कर), प्रकाशकः तारादेवी भास्कर शेळके पुणे. पहिली आवृत्ती, २०१३

कोत्तापल्ले नागनाथ. मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा (संपा : आवलगांवकर अविनाश), अरुण पालगांवकर प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, पहिली आवृत्ती २००६

निरगूडकर भारती. संशोधनपाथेय डॉ. भास्कर गिरिधारी गौरव ग्रंथ, (संपा: डॉ. धनाजी गुरव), शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१३

पवार लता. संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती, (संपा. शेळके भास्कर), प्रकाशकः तारादेवी भास्कर शेळके पुणे. पहिली आवृत्ती, २०१३

सानप किशोर. संशोधनपाथेय डॉ. भास्कर गिरिधारी गौरव ग्रंथ, (संपा: डॉ. धनाजी गुरव), शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१३

# प्रकरण २ :

# कादंबरी - स्वरूप आणि संकल्पना

## अनुक्रमणिका

२.१ प्रस्तावना........................................................................................20

२.२ कादंबरीच्या व्याख्या........................................................................ 21

२.२.१ मराठी व्याख्या................................................................................ 21

२.२.२ पाश्चात्य व्याख्या..............................................................................22

२..३ हिंदी व्याख्या.....................................................................................22

२.३ कादंबरीचे स्वरूप ..............................................................................22

२.४ कादंबरीचे घटक..................................................................................23

२.४. कथानक............................................................................................ 25

२.४.२ व्यक्तिरेखा.........................................................................................25

२.४.३ वातावरण.......................................................................................... 25

२.४.४ निवेदन.............................................................................................. 25

२.४.४.२ प्रथम पुरुषी पद्धती........................................................................ 26

२.४.४.२ तृतीय पुरुषी पद्धती....................................................................... 26

२.४.४.२ भाषाशैली.........................................................................................26

२.५ कादंबरीचे प्रकार.................................................................................. 27

२.५.१ आशयदृष्ट्या वर्गीकरण.......................................................................27

२.५.२ अभिव्यक्तिदृष्ट्या वर्गीकरण..............................................................29

२.६समारोप........................................................................................................30

२.७ निष्कर्ष........................................................................................................30

२.८ संदर्भ सूची....................................................................................................31

## २.१ प्रस्तावना

ललित वाङ्मयामध्ये कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी प्रकारांसोबत कादंबरी हा देखील ललित वाङ्मयातील खूप महत्त्वपूर्ण व लोकप्रिय असा प्रकार आहे. कादंबरी हा शब्द इंग्रजीतील 'नॉवेल' या शब्दासाठी पर्यायाने वापरला जाणारा शब्द आहे. 'बाणभट्ट' ह्याने लिहिलेल्या संस्कृतमधील 'कादंबरी' ह्या कथात्मक ग्रंथावरूनच हा शब्द मराठीमध्ये रूढ झालेला आहे. कादंबरी हा साहित्यप्रकार अठराव्या, म्हणजेच अर्वाचीन काळात युरोपमध्ये सर्वप्रथम उदयाला आला. युरोपमधील 'रिचर्डसन फिल्डिंग' यांना कादंबरीचे आद्य जनक संबोधले जाते. तरीही कादंबरीच्या उगमाच्या संदर्भात जपानमध्ये ती बाराव्या शतकात, चीनमध्ये पंधराव्या शतकात उगमाला आली असे वाद आहेत. 'बाणां'चा 'कादंबरी' हा ग्रंथ तर सातव्या शतकातील असल्यामुळे कादंबरीचा उगम भारतात झाला असे अनेकांचे मत आहे.

कादंबरीच्या मूळ स्वरूपाशी दृश्य असणारे साहित्य कित्येक देशांमध्ये खूप पूर्वीपासून निर्माण झालेली असू शकते, ज्यांचे घटक किंवा रूपबंध कादंबरीशी मिळते असू शकते. परंतु एक साहित्यप्रकार म्हणून कादंबरी अठराव्या शतकात युरोपातच विकसित झाली हे सत्य नाकारता येणार नाही. या संदर्भात मीनाक्षी मुखर्जी यांनी असे म्हटले आहे की "एकोणिसाव्या शतकातील युरोपमध्ये कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराने आपले स्पष्ट, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व धारण केले, तेव्हा त्याचा घाट हा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या महाकाव्य, अद्‌भुतकथा व वीरकथा (Saga) या कथनप्रकारांच्या संरचनांपेक्षा निश्चितपणे भिन्न होता." [१]

## २.२ कादंबरीच्या व्याख्या

कादंबरी हा कथात्म साहित्यप्रकार जरी असला तरीही इतर कथात्म साहित्यापेक्षा वेगळा ठरतो आणि कादंबरीचे हे वेगळेपण त्याच्या स्वरूपामुळेच निश्चित होत असते. विविध अभ्यासकांनी केलेल्या कादंबरीच्या व्याख्येच्या माध्यमातून कादंबरीचे गुणधर्म तर समजतात पण कादंबरीचे वेगळेपण अधोरेखित करणारे तिचे स्वरूपही समजते.

### २.२.१ मराठी व्याख्या

प्र. वा. बापट आणि ना. वा. गोडबोले :- “सत्यसृष्टीच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित-घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङमय विभाग.”[२]

भालचंद्र नेमाडे :-"कादंबरी म्हणजे प्रदीर्घ अधिक अवकाश असलेली,आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली,त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णत्वापेक्षा संपुर्णतेकडे, जास्त झुकलेले आहेत. अशी कलाकृती म्हणजे कादंबरी ज्यात एखाद्या समस्येचा पाठपुरावा संदर्भासकट केला जातो. संस्कृतीचे बारीक सारिक तपशील त्यात मांडले जातात. एखाद्या समाजाचा, राष्ट्राचा किंवा एका काळाचा वेध कादंबरीत घेतलेला असतो.”[३]

### २.२.२ पाश्चात्य व्याख्या

केथरीन लिव्हर :- "कादंबरी हा कथात्मक लिखित गद्याचा दीर्घ आणि लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंतवून टाकणारा असा रचनाबंध आहे. घटना,व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या लास्तवाचे संमिश्र दर्शन घडविणारा साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी."[४]

### २.२.३ हिंदी व्याख्या

प्रेमचंद :- "मै उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्रपर प्रकाश डालना और उसके रहस्यो को खोलना ही उपन्यासो का मूल तत्त्व है।’’[५]

मैथलीशरण गुप्त :- "उपन्यास साहित्य मानव जीवन की व्याख्या और आलोचना है।"[६]

श्याम सुंदरम् :- "उपन्यास मनुष्य के वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है।"[७]

### २.३ कादंबरीचे स्वरूप

कादंबरी हा कथात्मक गद्य साहित्यप्रकार आहे. कादंबरी मध्ये मानवी जीवनाचा विस्तृतपट आलेला असतो. तिचे एकूण स्वरूप हे लांब असते. तसे नसल्यास तिला कथा अथवा दीर्घ कथा असे म्हटले जाईल. कादंबरी मध्ये काल्पनिक व्यक्तिरेखा असतात, ज्यांच्या आयुष्यातील विविध प्रसंगांच्या मालिका सुसंगत पद्धतीने कादंबरीमध्ये

येतात. खरे म्हणजे कादंबरीला शब्द मर्यादा नसते. कादंबरीत जी पात्रे असतात त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, त्यांच्या कृती, त्यांच्या आयुष्यातील घटना व यातूनच निर्माण होणारे कथानक असते. कादंबरीच्या निर्मितीमागे बोध देणे, वास्तवाचे दर्शन घडवणे, रंजन करणे यासारख्या अनेक प्रेरणा असू शकतात. कादंबरीच्या लेखनामागील प्रेरणा पूर्णतः कादंबरीच्या लेखकावर अवलंबून असते.

कादंबरीतील कथेचा किंबहुना आशयाचा, अनुभवांचा आवाका खूप मोठा असतो. ज्यामुळे एक व्यापक जीवनाचे दर्शन कादंबरीच्या माध्यमातून वाचकांना होते. बाबुराव उपाध्ये म्हणतात, “एखाद्या देशाच्या किंवा लोकसमुदायाच्या सामाजिक जीवनव्यवहाराचा, त्यांच्या जीवन संदर्भाचा व्यापक चित्रपट कादंबरीत असतो.”[८] कादंबरीतील याच विशेषतेमुळे गद्य वाङ्मयात हा साहित्यप्रकार खूप लोकप्रिय ठरलेला दिसून येतो.

## २.४ कादंबरीचे घटक

व्याख्यांच्या आधारावरून कादंबरीचे स्वरूप नेमके काय असते हे समजते. कादंबरीची स्वरूप निश्चिती ही काही विशिष्ट घटकामुळे होत असते. ज्या घटकामुळे कादंबरी निर्माण होत असते कादंबरीला एक जिवंतपणा येत असतो त्या घटकांचे मूल्य लक्षात घेणे आवश्यक आहे. मुख्यतः कादंबरी या कथात्म वाङ्मयप्रकाराचे पाच घटक असतात.

### २.४.१ कथानक

कादंबरी हा ललित वाङ्मयप्रकार कथात्म स्वरूपाचा असल्यामुळे कादंबरीतील कथानकाला खूप महत्त्वाचे स्थान असते. कादंबरीच्या आराखड्याला तिची कथाच प्राण देत असते. कथानकाला कादंबरीचा मुख्य घटक मानले जाते. कादंबरीत ज्या विविध घटना घडत असतात त्यांच्या सुसंगत गुंफनातूनच कादंबरीचे कथानक साकारत असते इंग्रजीत कथानकाला ‘प्लॉट’ असा शब्द वापरला जातो. कथानकामुळे कादंबरी यशस्वी होत असते. कादंबरी वाचताना वाचकाचे लक्ष पूर्णपणे कथानकावर केंद्रित असते.

### २.४.२ व्यक्तिरेखा

व्यक्तिरेखा हा कादंबरीचा कथानका इतकाच महत्त्वाचा घटक आहे.कादंबरीत ज्या विविध व्यक्ती येत असतात त्यांच्या एकमेकांच्या संबंधातून जे घटना प्रसंग निर्माण होतात त्यातूनच कादंबरीचे कथानक आकाराला येत असते. लेखक आपल्या आयुष्यात ज्या लोकांना बघतो त्यातूनच प्रेरणा घेऊन तो कादंबरीत व्यक्तिरेखा निर्माण करत असतो. व्यक्तिरेखा या घटकासाठी पात्र हा शब्द देखील वापरला जातो. कादंबरीत मानवी स्वभावाचे अनेक कंगोरे असलेल्या विविध व्यक्तिरेखा येत असतात. काही व्यक्तिरेखा ह्या मुख्य असतात ज्यांच्या अवतीभवतीच कादंबरीचे कथानक फिरत असते आणि इतर व्यक्तिरेखा कादंबरीच्या कथानकात सहाय्यक भूमिका निभावत असतात ज्यांना गौण व्यक्तिरेखा म्हटले जाते.

### २.४.३ वातावरण

कादंबरीत येणाऱ्या पात्रांच्या संघर्षातून तसेच अनेक घटना प्रसंगातून जे कथानक निर्माण होत असते ते स्थलकाल विशिष्ट असते. त्या कथानकाला विशिष्ट अशी पार्श्वभूमी असते. म्हणून कादंबरी आकाराला आणण्यासाठी कादंबरीतील स्थळांचे व काळाचे वर्णन करणे खूप लक्षणीय ठरते. वातावरणातून कादंबरीची भौगोलिक व सामाजिक पार्श्वभूमी वाचकांसमोर स्पष्ट होत असते. त्याचबरोबर वातावरण या घटकाचे एक महत्त्वपूर्ण कार्य हे कादंबरीतील व्यक्तीस्वभावातील कारणमीमांसा व व्यक्तीभावनेला स्पष्ट करणे हेही असते.

### २.४.४ निवेदन

निवेदन म्हणजे कथन करणे. कादंबरीतील कथानक हे कथन केले जात असते ज्यालाच निवेदन असे म्हणतात. त्यामुळे कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार ठरतो. कादंबरीत येणाऱ्या घटना-प्रसंगांना अनुसरूनच निवेदन केले जात असते. निवेदन हे कादंबरीतील घटनांच्या मालिकेमधील दुवा असते. वातावरण निर्माण करणे, पात्रांची स्वभाव चित्रण करणे, कधी स्वागत तर कधी प्रसंगावरती भाष्य करणे हे सर्व कार्य निवेदनाच्या माध्यमातून कादंबरीत होत असते. कादम्बरीचे कथानक वाचकांसमोर हुबेहूब निर्माण करणे हे निवेदकाचे कार्य असते. “जीवनातील व्यापक दर्शन घडवणाऱ्या कादंबरीची निवेदनशैली ही सहज, अकृत्रिम व स्वाभाविक असली पाहिजे तिचा परिणाम उत्कट होतो.”[१] असे जानवी संत यांचे मत आहे. कादंबरीचे निवेदन हे दोन प्रकारे केले जाते.

### २.४.४.१ प्रथम पुरुषी निवेदन पद्धती

प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीत निवेदक हे कादंबरीचे पात्र असते. कादंबरीच्या एकूण कथानकाचा भाग म्हणूनच ते कादंबरीचे निवेदन करते. ही निवेदक पात्रे दोन प्रकारची असतात. एक जी कादंबरीची मुख्य पात्रे असतात व कथानक स्वतःला केंद्रस्थानी ठेऊन सांगत असतात. दुसरी निवेदक पात्रे ही कादंबरीच्या मुख्य कथानकाचा भाग जरी असली तरीही स्वतःला अलिप्त ठेऊन अथवा कथाविश्र्वाच्या सीमेवर राहून कादंबरीचे निवेदन करतात.

### २.४.४.२ तृतीय पुरुषी निवेदन

तृतीय पुरुषी निवेदनात निवेदक हा कादंबरीचा लेखक असतो. कादंबरीतील सर्व पात्रे लेखकाने घडवलेली असल्यामुळे पात्रांचे स्वभाव व त्यांच्या आयुष्यातील घडणाऱ्या घटना यासर्वांना तो कारणीभूत व सर्वसाक्षी असतो. प्रथमपुरुशी निवेदनाच्या विपरीत सर्व पात्रांचे स्वभाव व त्याची मते तो तठस्तपणे मांडू शकतो.

### २.४.५ भाषाशैली

भाषा ही मानवी भावना व्यक्त करण्याचे माध्यम असते. ही देश काळ परिस्थिती आणि व्यक्तीनिरूप बदलत असते. कादंबरी हा ललित गद्य साहित्यप्रकार असल्यामुळे लेखक कादंबरीची भाषा साधी सोपी पण प्रभावी निर्माण करत असतो. कादंबरीचे कथानक, कादंबरीतील पात्रे, घडलेल्या घटना आणि एकूणच वातावरण वाचकाच्या

डोळ्यासमोर हुबेहूब निर्माण करण्याचे सामर्थ्य हे भाषेत असते. त्यामुळे कादंबरीची भाषा जरी अलंकारिक असली तरीही ती क्लिष्ट असू नये.

कादंबरीतील भाषेच्या माध्यमातूनच निवेदन आकाराला येत असते. पात्रांच्या तोंडी येणारे भाषा आणि निवेदनासाठी वापरलेली भाषा जितकी आकर्षक असेल तितकेच आकर्षक स्वरूप कादंबरीला प्राप्त होत असते.

## २.५ कादंबरीचे प्रकार

कादंबरी हा साहित्यप्रकार  व्यापक अर्थाने जीवनदर्शन घडवतखूप असतो. ज्यामुळे कादंबरीचे वर्गीकरण विविध प्रकारामध्ये होत असते. कादंबरीच्या प्रकारांच मांडणी आशय व अभिव्यक्तीनुरूप करता येते.

### २.५.१ आशयदृष्ट्या वर्गीकरण

सामाजिक कादंबरी :- सामाजिक कादंबरीचा केंद्रबिंदू हा समाज आणि समाजातील समस्या असतो. बाबा पद्मनजी लिखित ‘यमुना पर्यटन’ ही मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी आहे. सामाजिक कादंबरीत समाजातील विविध प्रश्न व विविध सामाजिक समस्यांचे चित्रण केलेले असते. समाजात रूढ  असलेल्या वेगवेगळ्या प्रथा-परंपरा समाजातील श्रद्धा अंग-श्रद्धा यांचे वास्तववादी चित्रण सामाजिक कादंबरीत होत असते. सामाजिक कादंबरी ही बदलत्या समाजाचे विशेष टिपत असते.

राजकीय कादंबरी :- राजकारण व राजकीय वातावरण हे ज्या कादंबरीच्या आशयाचा प्रमुख भाग असते त्याला राजकीय कादंबरी म्हणतात. या कादंबरीमध्ये राजकारण, राजकीय घटना, राजकीय चळवळी व राजकीय व्यक्तिरेखांचे चित्रण असते. राजकीय कल्पनातूनच ही कादंबरी साकार होत असते.

ऐतिहासिक कादंबरी :- ऐतिहासिक घटना, पात्रे व स्थळ यांच्यावर आधारित असलेल्या कादंबरीला ऐतिहासिक कादंबरी म्हणतात. मोचनगड ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी आहे. ऐतिहासिक कादंबरीच्या माध्यमातून आदर्शाची उभारणी करत गौरवशाली इतिहासाचे चित्रण केले जाते.

पौराणिक कादंबरी :- पुराणातील घटनेवर किंवा पुराणातील एका पात्राला केंद्रस्थानी ठेवून जी कादंबरी लिहिली जाते तिला पौराणिक कादंबरी असे म्हणतात. पौराणिक कादंबरी मध्ये कल्पनेला जास्त प्राधान्य दिले जाते. वि. स. खांडेकर लिखित ‘ययाति’ ही पौराणिक कादंबरीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

मनोवैज्ञानिक कादंबरी :- मनुष्याच्या मानसिक आणि भावनिक अनुभवातून जी कादंबरी साकार होते तिला मनोविज्ञानिक कादंबरी म्हणतात. मनुष्य ज्या समाजात वावरत असतो त्याच समाजात त्याची जडणघडण होत असते. असे होत असताना मानसिक आणि भावनिक पातळीवर ज्या काही घडामोडी होतात त्यांना मनोवैज्ञानिक कादंबरीमध्ये महत्त्व असते. व्यक्तीच्या मनावर ज्या ताणतणावांचा परिणाम होत असतो त्यामागे ज्या अंतर्गत आणि बाह्य घटना कारणीभूत असतात त्याचा पाठपुरावा मनोवैज्ञानिक कादंबरी घेत असते.

विज्ञान कादंबरी :- ज्या कादंबरीच्या आशय सूत्रात विज्ञानातील एखादे तत्व किंवा घटक महत्त्वाचे असते तीला विज्ञान कादंबरी म्हणतात. विज्ञान कादंबरीमध्ये मानवी जीवनाच्या भविष्याचा वेध घेतला जातो. भविष्यात विज्ञानात व तंत्रज्ञानात जी प्रगती व क्रांती होऊ शकते तिचा विज्ञान कादंबरीच्या वर्तमादात विचार केला जातो.

ग्रामीण कादंबरी :- ग्राम, ग्रामीण व ग्रामीणत्व या तत्त्वावर आधारित व ग्रामीण संस्कृती व वास्तवाचे दर्शन घडवणारी कादंबरी म्हणजे ग्रामीण कादंबरी. ग्रामीण कादंबरीत ग्रामीण जीवनातील समस्या सुखदुःखे व चढ-उतार खूप संवेदनशीलपणे मांडलेले असतात.

दलीत कादंबरी :- दलित कादंबरी ही आधुनिक मराठी कादंबरीचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. एका सामाजिक आणि वाङ्मयीन अशा दुहेरी विचार मंथनातून स्वातंत्र्योत्तर काळात दलित ही संज्ञा १९६० नंतरच्या काळात खूप चर्चेचा विषय ठरली. ह्या देशातील समाजव्यवस्थेमध्ये सर्वात निम्न मानल्या जाणाऱ्या व अस्पृश्य घोषित केलेल्या दलित समाजाची व्यथा समस्या आणि संघर्ष चित्रित करणारी कादंबरी म्हणजे दलित कादंबरी होय.

## २.५.२ अभिव्यक्तिदृष्ट्या वर्गीकरण

चरित्रात्मक कादंबरी :- चरित्रात्मक कादंबरी ही इतिहासातील किंवा समकालीन व्यक्तीचे काल्पनिक अथवा वास्तविक चरित्र सांगणारे कादंबरीची एक शैली असते. चरित्रात्मक लेखन अभिव्यक्तीचा वापर करून लेखक करात्मक गरजा भागवतोच पण त्यामुळे कादंबरीतील प्रमुख पात्रला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

आत्मचरित्रात्मक कादंबरी :- आत्मचरित्रात्मक शैलीचा वापर करून लेखन केलेली कादंबरी म्हणजे आत्मचरित्रात्मक कादंबरी. ह्या कादंबरीत लेखक स्वतःच्या आयुष्याचा पट कलात्मकतेचा वापर करून व कादंबरीच्या साच्यात बसवून लेखन करतो.

## २. ६ समारोप

प्रस्तुत प्रकरणात कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप, संकल्पना ह्या कादंबरीच्या सिद्धांतिक भागाचा अभ्यास केला आहे. कादंबरी या संकल्पनेचा विचार करून एक वाङ्मयप्रकार म्हणून तिचे काय निकष आहेत ते जाणून घेतले आहे. अव्वल इंग्रजी काळात कादंबरीची सुरुवात पाश्चात्य साहित्यात सुरुवात झाली. मानवाच्या जीवनाशी निगडित असलेल्या या वाङ्मयप्रकारात वास्तवाचा व कल्पनेचा मेळ साधून कलात्मक अभिव्यक्तीने लेखन केलेले असते. कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, निवेदन व वातावरण ह्या पाचही घटकातून कादंबरीचे स्वरूप सिद्ध होत असते. आशय व अभिव्यक्ती दृष्ट्या कादंबरीचे विविध प्रकार पाडता येतात. मराठीत सर्वात आधी सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक कादंबरीचे प्रकार उदयाला आले. बदलत्या काळाप्रमाणे इतरही कादंबरीचे प्रकार प्रचलीत झाले. अभीव्यक्तिदृष्ट्या चरित्रात्मक व आत्मचरित्रात्मक कादंबरी असे प्रकार पाडता येतात.

## २.७ निष्कर्ष

- कादंबरी ह्या साहित्यप्रकाराचे निश्चित व्याख्या करणे कठीण आहे परंतु तिचे स्वरूप हे विस्तृत असते व मनुष्य जीवन व समाज कादंबरीचा आत्मा असतो असे म्हणता येते.
- कादंबरीचे घटक निश्चितपणे सांगता येतात ज्यांतूनच कादंबरीला स्वरूप प्राप्त होत असते.
- कादंबरी ही तत्कालीन समाज वास्तवाचा आरसा असते.

- कुठलीही कादंबरी ही एखाद्या कथा तत्वावर आधारित असते व ही कथा तत्व वास्तव व कल्पना यांच्या मिश्रणातून साध्य होत असते.
- कादंबरी हा ललित वाङ्मयप्रकार आधुनिक गध्यात्मक साहित्यप्रकार आहे.

## २.८ संदर्भ सुची

[१] मुखर्जी, मीनाक्षी. तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा (संपा. जहागीरदार चंद्रशेखर), सौरभ प्रकाशन कोल्हापूर. आवृत्ती पहिली १९९२. पृ. २४२

[२] प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले. मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन पुणे. आवृत्ती तिसरी १९७६. पृ. ३

[३] नेमाडे भालचंद्र. टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन औरंगाबाद. १९९०. पृ.१९८

[४] हस्तक उषा. साहित्यः अध्यापन आणि प्रकार, मौज प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली, १९८७ पृ. २५२

[५] अमरनाथ. हिंदी आलोचना की परिभाषिक शब्दावली, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, आवृत्ती दुसरी , २०१२, पृ. ९१

[६] बाबुराव दत्तात्रय उपाध्ये, मराठी वाङ्मय प्रकार, संकल्पना व वाटचाल (संपा. गंधारे द. के.) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर. आवृत्ती पहिली २०१७. पृ.४२

[७] उपाध्ये बाबुराव दत्तात्रय, मराठी वाङ्मय प्रकार, संकल्पना व वाटचाल (संपा. गंधारे द. के.) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर. आवृत्ती पहिली २०१७. पृ.४२

[८] उपाध्ये बाबुराव दत्तात्रय, मराठी वाङ्मय प्रकार, संकल्पना व वाटचाल (संपा. गंधारे द. के.) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर. आवृत्ती पहिली २०१७. पृ.४५

[९] उपाध्ये बाबुराव दत्तात्रय, मराठी वाङ्मय प्रकार, संकल्पना व वाटचाल (संपा. गंधारे द. के.) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर. आवृत्ती पहिली २०१७. पृ.४६

गिंडे वा.पु.. साहित्य आस्वाद, अध्यापन आणि समीक्षा (संपा. बडवे सतीश), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पहिली आवृत्ती २०१३

ठाकूर रवींद्र. साहित्य : समीक्षा आणि संवाद, प्रकाशक राजीव दत्तात्रय बर्वे, दिलीपराज पुणे. प्रकाशनदुसरी आवृत्ती २०१४

# प्रकरण ३ :

# साने गुरुजींच्या कादंबऱ्यांची घटकानुरुप चिकित्सा

## अनुक्रमणिका


३.१ प्रस्तावना........ 35

३.२ साने गुरुजी यांच्या कादंबऱ्यांचे कथानक........ 36

३.२.१ राजकीय कादंबऱ्या ........ 36

३.२.१.१ पुनर्जन्म (१९३९)........ 36

३.२.१.२ क्रांती (१९४०)........ 37

३.२.१.३ गोड शेवट (१९४६)........ 38

३.२.१.४ संध्या (१९४६) ........38

३.२.१.५ चित्रकार रंगा (१९४२)........ 39

३.२.२ साने गुरुजी यांच्या सामाजिक कादंबऱ्या........40

३.२.२.१ धडपडणारी मुले ........ 40

३.२.२.२ सती........ 40

३.२.२.३ नवा प्रयोग (१९३१)........ 41

३.२.२.४ रामाचा शेला (१९४४)........ 42

३.२.२.५ दिगंबर राय ........ 43

३.२.२.६ दीनबंधू........ 43

३.३ ठळक व्यक्तिरेखा........ 44

३.३.१ पुनर्जन्म ........ 44

३.३.२ क्रांती ........................................................................................ 46

३.३.३ गोड शेवट........................................................................................ 48

३.३.४ संध्या........................................................................................ 50

३.३.५ चित्रकार रंगा ........................................................................................ 51

३.३.६ धडपडणारी मुले ........................................................................................ 52

३.३.७ सती ........................................................................................ 54

३.३.८ नवा प्रयोग ........................................................................................ 55

३.३.९ रामाचा शेला ........................................................................................ 56

३.३.१० दिगंबर राय ........................................................................................ 58

३.३.११ दीनबंधू........................................................................................ 59

३.४ भाषाशैली ........................................................................................ 60

३.५ निवेदन पद्धती........................................................................................ 62

३.६ वातावरण निर्मिती........................................................................................ 63

३.७ समारोप ........................................................................................ 66

३.८ निष्कर्ष........................................................................................ 67

३.९ संदर्भसूची........................................................................................ 68

## ३.१ प्रस्तावना

साने गुरुजी हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कादंबरी लेखन करणारे एक महत्त्वाचे कादंबरीकार होते. त्यांनी आपल्या मनातील तळमळीने कादंबरी लेखन केले. तत्कालीन भारताची सामाजिक परिस्थितीची साने गुरुजींना जाण होती व त्या अनुषंगाने भारतीय सामाजिक विषमतेवर बोट ठेवणारे कादंबरी लेखन साने गुरुजींनी केले. कादंबरी लेखनाच्या माध्यमातून त्यांनी समाज सुधारण्याचे धोरण पुढे नेले. आपल्या देशाला आत्मनिर्भर, स्वावलंबी कसे बनावे हे शिकवले. स्वदेशीचा वापर, खादीचा वापर या गोष्टी तर सांगितल्याच पण त्याचबरोबर समाजातील गरीब-श्रीमंत भेद, स्त्रियांचे शोषण, अस्पृश्यता यासारख्या सामाजिक प्रश्नांवरही लेखन केले. बहुजन समाजाच्या हृदयाला वाचा फोडली. शेतकऱ्यांची परिस्थिती जगासमोर आणली. अशा प्रकारचे कादंबरी लेखन करणाऱ्या साने गुरुजींच्या लेखणीतून अठरा कादंबऱ्यांचे लेखन झाले.

साने गुरुजींनी लेहिलेल्या एकूण अठरा कादंबऱ्यांपैकी 'श्यामची आई', 'श्याम खंड १', 'धडपडणारा श्याम अर्थात श्याम खंड २' व 'जीवन-विकास अर्थात श्याम खंड ३' ह्या चार कादंबऱ्या साने गुरुजींचे बालपण आणि तारूण्यावस्थेतील चरित्र सांगणाऱ्या आत्मचरित्रापर कादंबऱ्या आहेत. गुरुजींनी 'कालिमातेची मुले' व 'तीन मुले' ह्या सामाजिक परंतु रुपांतरीत कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तासेच 'आस्तिक' ही पौराणिक स्वरुपाची कादंबरी लिहिली आहे. ह्या सात कादंबऱ्या वगळून इतर सर्व सामाजिक व राजकीय स्वरूप प्राप्त झालेल्या कादंबरयांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात आणि प्रबंधीकेत झाला आहे.

## ३.२ साने गुरुजी यांच्या कादंबऱ्यांचे कथानक

### ३.२.१ राजकीय कादंबऱ्या

#### ३.२.१.१ पुनर्जन्म (१९३९)

गोविंदराव हे खूप चंचल स्वभावाचे असतात. ह्याच कारणामुळे कुठल्याही एका ठिकाणी ते जास्त काळ टिकत नाहीत. सुंदरपुरात ते गाण्याचे  वर्ग सुरू करतात परंतु वर्गात येणाऱ्या मुलींसोबत ते दुर्व्यवहार करू लागतात. भाऊरावांची पत्नी आनंदीबाईवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतात व भाऊरावांच्या मनात आनंदीबाई वाईट चरित्राची आहे असा गैरसमज निर्माण करून देतात. आनंदीबाई माहेरीला गेल्यानंतर भाऊरावांना वाईट संगतीला लावण्याचा प्रयत्न करतात परंतु मनोहर गोविंदरावांचे हे प्रयत्न मोडून लावतो. आनंदीबाई व भाऊराव यांना परत एकत्र आणतो. तारा ही गोविंदरावांची पत्नी असते. जी गोविंदरावांच्या स्वभावामुळे घर सोडते. मनोहरला ताराच्या मुलाचा लळा लागतो. मुलाला मनोहरजवळ सोडून आत्महत्या करण्याचा प्रयत्नही करते पण पुढे आत्महत्याचा विचार बदलून फुलगाव येथे नोकरी करते. आनंदीबाई व भाऊरावांना स्वतःचा मूल नसल्यामुळे आपले मुल त्यांना दत्तक देते. मनोहरच्या संपर्कात आल्याने भाऊराव गरीब शेतकऱ्यांचे त्यांच्याजवळ असलेले कर्जरोखे माफ करतात व शेतकऱ्यांना सुखी करतात. पुढे भाऊराव व आनंदीबाई स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन कारावासाची शिक्षा भोगतात.  खादी वस्त्राचा प्रचार-प्रसार व स्वदेशी वस्तूंचा उपयोग हे विचार या कादंबरीत मांडलेले आहेत.

## ३.२.१.२ क्रांती (१९४०)

आपल्या देशातील गरिबी व भिकारी संपवण्यासाठी तसेच उपाशी बंधूंना जगण्यासाठी खादी शिवाय दुसरा पर्याय नाही हे या कादंबरीत पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दयाराम, मानक, हिरालाल हे खादीचा प्रचार करताना दिसतात. तर रामदास, शांता, माया, मुकुंदराव व मोहन हे सर्वजण चरख्यावर सूत काढतात. गरीब आया बहिणीकडून कातलेले सूत विकते घेऊन त्यांना रोजगार देतात. मुकुंदराव हे पेशाने शिक्षक असल्यामुळे आधी शाळेत व शाळेतून काढून टाकल्यानंतर सोनखेडीच्या आश्रमात जाऊन ग्रामसफाई स्वदेशी, अस्पृश्यता व खादीचा वापर या सर्व गोष्टींवर मार्गदर्शन करतात.

शांता हे पात्र स्त्रीने शिक्षण घेणे का महत्वाचे आहे हे सांगते. शिक्षण हे फक्त सामान्य व्यवहार करण्यासाठीच नाही. तर स्त्रीला आत्मा आहे म्हणून तिने शिकावे हे सांगितले आहे. अन्नाची भूक जशी महत्त्वाची असते तशीच विचारांची भूकही महत्त्वाचे असते व यालाच क्रांती म्हणतात हा विचार या कादंबरीतून प्रकट झालेला दिसतो.  विद्यार्थी संघटना कामगार संघटना किसान संघटना यांच्यात क्रांती करण्याचे विचार त्याचबरोबर गरीब जनतेचे सशक्तिकरण, खादीचा वापर, स्वच्छता राखणे, स्त्रियांना व वृद्धांना शिकवून साक्षरता वाढवणे यासारखे विचार या कादंबरीतून मांडलेले आहेत.

## ३.२.१.३ गोड शेवट (१९४६)

खानदेशातील ध्येयवादी जगन्नाथ व गुणा हे दोन श्रीमंत-गरीब मित्र व त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या इंदू व इंदिरा यांचीही कथा आहे. ध्येयवादी व स्वातंत्र्य सैनिक गुणा व जगन्नाथ यांची कथा सांगताना त्या दोघांची प्रेमकहाणी या कादंबरीत सांगितलेली आहे. आंतरप्रांतीय विवाह हे विषय या कादंबरीत आलेले आहे. स्वतःच्या पतींची वर्षानुवर्षे वाट पाहणाऱ्या पतिव्रता व सत्वशिल अश्या इंदिरा आणि इंदू या दोन्ही मैत्रिणी टकळीवर सूत काढतात. स्वतःच्या पतींसाठी खादीचे हार तयार करून त्याच्या गळ्यात घालतात. दयाराम भारती या पात्राच्या माध्यमातून या कादंबरीत एक क्रांतिकारक व्यक्तिमत्व आले आहे.

## ३.२.१.४ संध्या (१९४६)

साम्यवादी, कम्युनिस्ट क्रांती करणाऱ्याचे जीवनदर्शन घडवणारी व त्यांच्यातील त्रुट्या सांगणारी ही कादंबरी आहे. याचबरोबर दुसरीकडे कम्युनिस्ट कल्याण बरोबर संसार करत असताना देशकार्यासाठी झीजणाऱ्या ध्येयवादी संध्येचे जीवनचित्र रेखाटले आहे. कल्याण हा लहानपणापासूनच देशकार्यासाठी समर्पित आलेला आणि क्रांतिकारी विचार बाळगणारा युवक असतो. पुढे पुण्याला शिक्षण घेण्यासाठी गेल्यानंतर त्याच्याच प्रकारे ध्येयवादी विचार असलेल्या विश्वास बरोबर त्याची मैत्री होते. 1930च्या चळवळीत दोघे भाग घेतात. सध्याही शाळेत तिरंगा फडकवणे इतर मुलींबरोबर प्रेभात फेरी काढून क्रांतीची गीते म्हणणे यासारखे देश कार्य करते.

कादंबरीत आलेली सर्व पात्रे देश प्रेमाने भरलेली आहेत. साम्यवादी विचारांचे कल्याण व विश्वास यांच्याबरोबर गांधीवादी विचार असलेले भाईजी ही या कादंबरीत महत्त्वाचे पात्र आहे. साम्यवाद व गांधीवाद यांच्यातील वैचारिक द्वंद्व या कादंबरीत आले आहे.

### ३.२.१.५ चित्रकार रंगा (१९४२)

चित्रकलेच्या माध्यमातून ध्येयवाद जोपासणाऱ्या श्रीरंग ह्या चित्रकाराचे जीवनदर्शन घडवणारी ही कादंबरी आहे.  तापाची साथ आल्यामुळे लहानपणातच रंगाच्या वडिलांचा देहांत होतो. रंगाची आई त्याला आधी पुण्यात भावाकडे घेऊन जाते परंतु भावजय बरोबर वाद झल्यामुळे ती पुण्यात स्वतंत्र खोली घेऊन राहू लागतात. लोकांच्या घरी धुणी-भांडी करून व मिळेल ते काम करून रंगाची आई त्याला शिकवते. रंगाला लहानपणापासूनच चित्रकलेचा नाद असतो. परंतु वासूकाका त्या चित्रकलेला ध्येयवादी विचारांची जोड देतात. वासू काकांसारख्या वडीलधाऱ्यांच्या छत्रछायेत रंगाचा बौद्धिक विकास होतो. वसुकाका रंगाला शिक्षणासाठी मुंबईला पाठवतात फैजपूर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात रंगाची भेट नंदलाल ह्या महाचित्रकाराची होते. नयना रंगावर प्रेम करीत असते. आपले ध्येय जपत असताना रंगा स्वतःच्या आरोग्याकडे ध्यान देऊ शकत नाही व अल्पायुच त्याचा देहांत होतो. पण पतिव्रता नयना आयुष्यभर रंगाच्या ध्येयाला जोपासते. रंगाच्या देहान्तानंतर भारत चित्रकला धाम हे त्याचे अपूर्व राहिलेले काम नयना पूर्ण करते.

## ३.२.२ साने गुरुजी यांच्या सामाजिक कादंबऱ्या

### ३.२.२.१ धडपडणारी मुले

अस्पृश्यता निवारण, स्वदेशी, श्रमदान, खादी प्रचार, साक्षरता प्रसार, यासारख्या महात्मा गांधीजींच्या विचारांचे महत्त्व पटवून देणारी ही कादंबरी आहे स्वामीजी छात्रालयातील विद्यार्थ्यांबरोबर राहून त्यांना हेच देश कार्य करण्या ।साठी प्रेरित करतात. त्यांच्याबरोबर दर रविवारी मारवाड या गावी जाऊन आरोग्याचे महत्त्व पटवून देतात. हरिजन लोकांची दयनीय परिस्थिती, शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती यांचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे. स्वामीजींच्या विचाराने प्रेरित झालेले नामदेव, रघुनाथ वामन, हरी, यशवंत, तारा, वेणू हीच या कादंबरीतील धडपडणारी मुले ही मुले स्वतःचे जीवन राष्ट्रासाठी खर्च करतात. स्वामीजींच्या आचार विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला आहे.

### ३.२.२.२ सती

भारतीय समाजात पूर्वीपासून चालत आलेल्या जरठकुमारी विवाह या प्रथेवर प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे. मैना व गोपाळराव एकमेकांवर प्रेम करत असतात. परंतु मैनाचे वडील म्हाताऱ्या जहागीरदाराकडून कडून पैसे उसने घेतात व मैनेचे लग्न त्याच्याशी लावून देतात. या कादंबरीत जरठकुमारी विवाहाचे घोर परीणाम दाखवून दिलेले आहेत. म्हाताऱ्या जहागीरदाराशी लग्न ठरल्यानंतर स्वतःच्या घरातील लोकांच्या विरोधात न जात आपल्या लहान भावाच्या आयुष्याचा विचार करून ती लग्नासाठी तयार होते. म्हाताऱ्या नवऱ्याची मरेपर्यंत सेवा करते. पतीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या जिथे बरोबरच सती जाते व तिच्यावर नितांत प्रेम करणारे गोपाळरावही त्या चितेत स्वतःला विलीन

करून घेतो. मैनाच्या निधनाच्या दुःखानेच तिच्या आईचा मृत्यू होतो. ह्या कादंबरीत आलेल्या सर्व पात्रांच्या माध्यमातून लेखकाने एक परिपूर्ण शोकांतिका वाचकांसमोर मांडली आहे.

### ३.२.२.३ नवा प्रयोग (१९३१)

श्रम संस्कारांचे महत्त्व पटवून देणारी ही कादंबरी आहे. घनश्याम हा नेहमीच नवीन नवीन प्रयोग करत असतो. सुंदरपुर गावात स्वच्छता सप्ताह, साक्षरता सप्ताह धडवून आणतो. कामगारांची चळवळ व संघटना करतो त्यांच्यासाठी वाचनालय सुरू करून त्यांना नवीन विचार देतो. हे सगळे करत असताना मुकुंद दासांचा रोष पत्करतो. ज्यामुळे पोलिसांकडून त्याला अटक होते. अटक झाल्यानंतर त्याचे सर्व मित्र संप करतात परंतु ते यशस्वी होत नाही.

सखाराम व घनश्याम हे इंदूर जवळ असलेल्या एका जमिनीची मशागत करतात. स्पृश्य-अस्पृश्य श्रीमंत-गरीब यासारखे सामाजिक भेद न पळत सामूहिक शेती करू लागतात. त्याबरोबरच तिथे गोशाळा सुरू करतात. दंगलीतील मुसलमान लोकांना आश्रय देतात. तेथील मुलांना शिकवतात. या कादंबरीतील सर्व पात्रे गांधीजीची शिकवण आचरणात आणतात. मानवता जोपासतात. सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकता, सामुदायिक शेती या सर्वांचे महत्त्व या कादंबरीत लेखकाने पटवून दिले आहे.

## ३.२.२.४ रामाचा शेला (१९४४)

रामाच्या शेला या कादंबरीत लेखकाने हिंदू धर्मातील बालविवाह व बाल विधवा विवाह याबद्दलचे मत व्यक्त केले आहे. सरला या पात्राच्या माध्यमातून लेखकाने या कादंबरीत स्त्रियांच्या दुःखांना समाजासमोर आणले आहे. कुठल्याही वाईट गोष्टीसाठी त्यांना जबाबदार धरले जाते. हे पूर्णतः अयोग्य आहे. सरलेच्या जन्माच्या वेळीच तिच्या आईचा व नंतर कालांतराने तिच्या भावंडांचा ही मृत्यू होतो.  वडिलांनी लग्न लावून दिल्यानंतर पंधरा दिवसांच्या आतच तिच्या पतीचाही मृत्यू होतो. अशा या मृत्यूंसाठी सासू-सासरे तिलाच कारणीभूत ठरवतात व घरातून हाकलून देतात. आपले आयुष्य कसे काढू हे ती आपल्या वडिलांना विचारते परंतु वडील आपल्या बाल विधवा मुलीचे लग्न लावून देत नाहीत नाही उलट स्वतः उतारवयात दुसरे लग्न करतात.

याच दरम्यान सरला व उदय यांचे प्रेम वाढते तिला उदयापासून दिवस जातात हे सर्व वडिलांपासून लपवण्यासाठी ती पंढरपूरला जाऊन बाळंतपण करते. पंढरपूरला अनाथ आश्रमात स्वतःच्या बाळाला ठेवून उदयाच्या शोधात जाते. येत असताना ती दुर्दैवाने कुंटणखान्यात सापडते निरंतर प्रयत्न करून तिला यश प्राप्त होते व ती कुंटणखान्यातून स्वतःची सुटका करून घेते. पुढे सरला नाशिक येथे धर्ममार्तंडाच्या सभेत येऊन भाषण करून सर्व लोकांना थक्क करते. तेथील एका पंडिताच्या सभेत जाऊन मत मांडण्याचा एक क्रांतिकारक विचार कादंबरीत मांडला आहे. ती सभेत हरिजनांना मंदिरात घ्या, देवाला त्याची लेकरे भेटू द्या, अस्पृश्यांना ही देव देवळात येऊ द्या असे विचार मांडते.

## ३.२.२.५ दिगंबर राय

दिगंबर राय या कादंबरीत स्वदेशी व खादी कपड्यांचा वापर करणे या विचारावर जोर दिला आहे. दिगंबरराय व राखाल या पात्रांच्या रूपाने स्वदेशाविषयीचे प्रेम व्यक्त झाले आहे. दिगंबरराय स्वतः खादी कपडे वापरतात व आयुष्यभर कधीच विलायती कपड्यांना हात लावत नाही. राखाल हे कधीही विलायती मिलचे सूत विणत नाहीत. दिगंबर राय स्वतःच्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने राखाल कडून खादीचे कपडे विणून घेतात. स्वदेशी कपडे तयार केले म्हणून राखाल ब्रिटिश सरकारच्या रोशाला कारणीभूत ठरतात. व त्यांना फाशीची शिक्षा होते. त्याचप्रमाणे दिगंबर राय यांनाही जन्मठेप शिक्षा होते. कारावासातील शिक्षा भोगत असतानाच दिगंबरराय यांचा मृत्यू होतो.

## ३.२.२.६ दीनबंधू

या कादंबरीत बाबू व त्र्यंबकराव या पात्रांच्या रूपाने विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील नाते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. जीवन, गोविंदा, हिरालाल या पात्रांच्या रूपाने खादीचे महत्त्व पटवून दिले आहे. दीनबंधू या कादंबरीत बंगाल व महाराष्ट्रीय संस्कृती कशी एक आहे हे सांगितले आहे. भाषा जरी वेगवेगळ्या असल्या तरीही आपण सारे भारत मातेची मुले आहोत हे पटवून दिले आहे. भिन्न भिन्न प्रांतातील मुला मुलींनी आंतरजातीय विवाह केले पाहिजे याबद्दल स्वतःचे मत लेखकाने व्यक्त केले आहे.

## ३.३ ठळक व्यक्तिरेखा

व्यक्तिरेखा ही कादंबरीचा एक अविभाज्य घटक असतो. व्यक्तिरेखेचे निर्मितीस्वातंत्र्य कादंबरीकाराला असते. कादंबरीत येणाऱ्या घटना प्रसंगातून व्यक्तिरेखा वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्त होत असते. त्यावरून त्या व्यक्तिरेखेचे स्वभाव वैशिष्ट्य व गुणधर्म समाजत असतात. साने गुरुजींच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा ह्या नेहमीच समाजोद्धारासाठी आणि मानव जातीच्या हितासाठी निर्माण झालेल्या आहेत. साने गुरुजींच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा कादंबरीला रंजक बनवण्यासाठी किंवा कादंबरीच्या कथानकाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून नाही तर साने गुरुजींची वैचारिकता वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी निर्माण झालेल्या आहेत असे वाटते.

### ३.३.१ पुनर्जन्म

भाऊराव हे वकिली करणारे गृहस्थ आहेत. ते कुणावरही विश्वास ठेवतात ज्यामुळे अनेक लोक त्यांचा गैरफायदा घेतात. परंतु याची त्यांना चिंता नाही. पिढीजात सावकारीवर व शेतीवर त्यांचा गुजारा होतो. त्यांना संगीताचे वेड आहे. ते पेटी व सितार वाजवतात. त्यांना गोविंदराव, मनोहर यासारखे मित्र भेटतात. गैरसमजामुळे त्यांची पत्नी आनंदी माहेरी निघून जाते. त्यावेळेस ते विचित्र वागू लागतात. चैनी व विलासी आयुष्य जगतात परंतु मनोहर त्यांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देतात व त्यांना वाईट संगतीतून बाहेर काढतात. शेवटी मनपरिवर्तन झाल्यानंतर ते गरीब शेतकऱ्यांना कर्जमुक्त करतात. चरख्यावर बसून खादी विणायला सुरू करतात. वर्तमानपत्रे, पुस्तके वाचतात. गावातील लहान मुलांसाठी शाळा उघडी करतात. पुढे जाऊन ते ब्रिटिश सरकाराविरुद्ध चळवळीत भाग घेतात ज्याचा परिणाम

म्हणून त्यांना तुरुंगवास होतो. भाऊराव यांच्या माध्यमातून लेखकाने देशप्रेम खादीचा प्रचार व प्रसार यासारखे विषय वाचकांसमोर आणलेले आहेत.

मनोहर या पात्राच्या माध्यमातून साने गुरुजींचे खादी विषयक विचार या कादंबरीत आलेले आहेत. मनोहर हा दिवसाला शंभर रुपयाची खादी विकल्याशिवाय जेवणार नाही असा संकल्प करणारा युवक आहे. तो खूप उत्साहाने खादी विकतो. त्याचा सत्कर्मावर विश्वास आहे. सत्कर्म केल्याने शेवटी सगळं काही भलं व चांगलं होईल असे तो मानतो. विद्यार्थी संघात प्रवचने व व्याख्यान करून उपदेश देतो. पहाटे प्रभात फेरी काढून गाणी म्हणतो. भाऊराव सारखा एक चांगला गृहस्थ जेव्हा वाईट संगतीला लागतो त्यावेळेला त्याला चांगला उपदेश करून त्याचे मनपरिवर्तन करतो. फुलगावात मुलांना शिकवणे, मुलांची सात्विक करमणूक करणे, मुलांबरोबर बागेतील झाडांना पाणी घळणे यासारखी कामे ते करतात. शेवटी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्यामुळे इंग्रज सरकार त्यांना तुरुंगवासाची शिक्षा देतात.

आनंदी ही साधी, भोळी, प्रेमळ, निर्दोष, निर्मळ व निष्पाप भावनांची भाऊरावांची पत्नी आहे. भाऊरावांप्रमाणेच तीही कलाप्रेमी आहे. भरतकाम करायला घरात स्वच्छता ठेवायला सुंदर स्वयंपाक करायला तिला आवडतो. आनंदीचा भाऊरावाबरोबर खूप चांगला संसार चालत असतो. आपल्या पत्नी बरोबर ती खूप मोकळ्यापणाने बोलत असते. वाद-विवाद करत असते. तिच्या सुखी संसाराला गोपाळरावची नजर लागते. गोपाळरावाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्याला ती सडेतोड उत्तर देऊन वाईट-साईट बोलते. तेव्हापासून तिच्या आयुष्यात निराशा येते. तिच्यावर माहेरी निघून जाण्याचा प्रसंग येतो. पुढे जाऊन भाऊरावांना तुरुंगवास होतो तेव्हा ती सुंदर पुरला स्त्रियांची सभा घेते. त्यांना स्वदेशीचे धडे देते.

गोविंदराव हा उंच, सडपातळ, नेहमी गोड बोलणारा पण मनात पाप असलेला गवई आहे. त्याचे अंतरंग विषाने भरलेले आहे. स्वच्छंदी स्वभाव असलेला गोविंदराव मित्राची पत्नी आनंदीवर अतिप्रसंग करतो. भाऊरावाच्या मनात तिच्याबद्दल गैरसमज निर्माण करून देतो. आनंदी माहेरी निघून गेल्यानंतर भाऊरावांना वाईट नादाला लावतो. त्याच्या मनात खादीविषयी तिरस्कार आहे. खादी म्हणजे भिकारपणा असे त्याचे मत आहे. परंतु पुढे तुरुंगवासाची शिक्षा भोगून आल्यानंतर तो चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करतो. पूर्वी खादीचा विरोध करणारा गोविंदराव खादी वापरू लागतो.

## ३.३.२ क्रांती

क्रांती या कादंबरीतील सर्व महत्त्वाची पात्रे ही साने गुरुजींचे वेगवेगळे विचार घेऊन आली आहेत. या कादंबरीतील रामदास हा गोविंदराव यांचा दत्तक व रामराव यांचा रक्ताचा मुलगा. रामदास हा खूप लहान वयातच समंजस झाला आहे. रामदास स्वतः खादी वापरून समाजात खादीचा प्रचार देखील करतो. खादी मुळेच गरिबांचे संसार चालतात असे त्याचे मत आहे. रामदासचे वडील गोविंदराव हे खूप श्रीमंत असल्याने तो त्यांच्याकडून पैसे घेऊन गरिबांची सेवा करतो. गरीब जनतेकडून खादी विकत घेतो. आपण गरिबांची खादी विकत घेतल्यामुळे गरिबांच्या घरात दिवाळी साजरी होणार याचा त्याला आनंद आहे. या प्रसंगातून त्याच्या मनातील गरिबांविषयी असणारी तळमळ दिसून येते. रामदास विश्वभारतीत जाऊन संगीताचे प्रशिक्षण घेतो. तेथील खेड्यांमध्ये जाऊन गरिबांची, कष्टी किसानांची व रंजलेल्या गांजलेल्या दरिद्री लोकांची सेवा करतो. तेथील लोकांमध्ये एकरूप होऊन जातो. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्याकडे गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या गहाण होत्या त्या मुक्त करतो.

शांता ही रामदासची बहिण आहे. रामदास प्रमाणे तिलाही समाजसेवा करायला आवडते. तिची स्वदेशी वर प्रेम आहे. ती गावात जाऊन स्त्रियांना व वृद्ध लोकांना साक्षर बनवते. शांता हे खूप प्रेमळ व साध्या स्वभावाची मुलगी आहे.

मोहन हा उदात्त व कष्टाळू शेतकऱ्याचा मुलगा आहे. सुंदर हसणं व चांगलं वागणं हा त्याचा स्वभाव आहे. दुर्दैवाने त्याचे तीनदा लग्न होऊन तिन्ही बायकांचा मृत्यू झालेला असतो. तो गावातील पुरुषांसाठी साक्षरतेचे वर्ग घेतो. ह्या कामात त्याला शांता मदत करते. मोहन शांतेकडे एक थोर मनाची व स्वतःला शिक्षा देणारी गुरु म्हणूनच पाहतो. त्याचे खूप साधे व सरळ विचार आहेत. त्याला मोठेपणा आवडत नाही. कसं का होईना परंतु सर्व जनता साक्षर व्हायला हवी शहाणी व स्वावलंबी बनायला पाहिजे असे त्याचे मत आहे. त्यांनी जगाला डोळसपणे बघायला पाहिजे असे त्याला वाटते. मोहन धनगाव येथे कामगारांची संघटना निर्माण करतो. कामगारांसाठी वर्ग चालवतो. कामगारांच्या बायकांनाही शिकवतो व त्यांच्या सुखदुःखाची चौकशी घेतो.

मुकुंदराव हे खादीचा प्रचार व सत्कर्म करणारे गृहस्थ आहेत. पेशाने ते शिक्षक आहेत व मुलांना चांगले संस्कार देऊन घडवण्याचे काम करतात. रामदास व शांता हे त्यांचेच विद्यार्थी आहेत. वयाने जरी पोक्त असले तरी विचारांनी तेजस्वी व तरुण आहेत. नवभारताचे उज्वल भविष्य डोळ्यासमोर ठेवून ते विद्यार्थ्यांना घडवतात. रामदास बरोबर बंगालच्या शांतिनिकेतनात जाऊन तेथे ते व्याख्यान देतात. गरिबांच्या व शेतकऱ्यांच्या संघटनेत व संपामध्ये नेहमीच सर्वांच्या पुढे असतात.

### ३.३.३ गोड शेवट

गोड शेवट या कादंबरीत प्रामुख्याने गरीब व श्रीमंत असे दोन प्रियकर व त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या दोन प्रेयसी या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. श्रीमंत घरात जन्माला आलेला जगन्नाथ हा पंढरीचा लहान मुलगा आहे. त्याला गरिबांबद्दल अतिशय प्रेम वाटते. गरीब शेतकऱ्यांचा छळ झालेला त्याला आवडत नाही. जगन्नाथचे गरीब गुणावर प्रेम असल्याने तो स्वतःचा रेशमी सदरा, धोतर व अंगठी त्याला देतो. गरीबात व श्रीमंतात अंतर राहू नये असे त्याला नेहमी वाटते यासाठी तो स्वतःच्या घरांच्या विरोधात सुद्धा जातो. स्वतःची गरीब इस्टेट वाटून द्यावी असे त्याला वाटते. तो मित्रांबरोबर खेड्यात जाऊन साफसफाई करणे, चरखा चालवून खादी तयार करणे, शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी त्यांचे प्रबोधन करणे, सावकारी नष्ट व्हावी यासाठी मेळ घडवून आणणे अशी कामे करतो.

या कादंबरीत इंदिरा हे पात्र जगन्नाथाची बायको आहे. ती चरख्यावर खादी कातते. हरिजन वस्तीत महिलांमध्ये जाऊन हळद-कुंकू करते. स्वतःच्या पतीवर अतोनात प्रेम असताना सुद्धा त्याला भारत दर्शन करण्याची परवानगी देते. तसेच कावेरी हे पात्र सुद्धा या कादंबरीत महत्त्वाचे आहे. ती बाल विधवा आहे ती स्वतःचे आयुष्य समाजसेवेत घालवते. स्त्रियांचे साक्षरता वर्ग चालवणे, अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन त्यांना साक्षर करणे, हिंदी पुस्तकांची तामिळमध्ये भाषांतर करते साक्षरता वर्गातून मिळणारे उत्पन्न हरिजन आश्रमात वाटून देणे हे कार्य ती करते. बालविधवा असल्यामुळे तिला पुनर्विवाह करण्यासंबंधी विचारले जाते परंतु ती नकार देते. कारण तिने आपले मन जगन्नाथच्या प्रती समर्पित केले असते. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश व्हावा म्हणून ती जगन्नाथ बरोबर सत्याग्रहात सामील होते.

गुणा हा रामरावाचा मुलगा व जगन्नाथांचा का जिवलग मित्र आहे. त्याची आर्थिक परिस्थिती ठीक नाही. तो स्वाभिमानी आहे परंतु मित्र प्रेमामुळे जगन्नाथने दिलेले कपडे व अंगठी नाकारू शकत नाही. मॅट्रिक नंतर मनात नसतानाही वडिलांसोबत त्याला गाव सोडून जावे लागते व दोन मित्रांमध्ये विरह निर्माण होतो. गुणाला डॉक्टर व्हायचे असल्यामुळे तो खूप परिश्रम घेतो. स्वतःला मिळालेल्या पैशांचा काटकसरीने  वापर करतो.  तो शाळेत जाण्यासाठी खादी शर्ट व पेंटचा वापर करतो.

इंदू ही सुसंस्कृत, प्रेमळ स्वभावाची व सेवाभावी गुणांची युवती आहे. तिला संगीताची आवड आहे. ती पेटी वाजवायला शकते. गाण्याच्या वर्गाला जाते. मोकळ्या वेळेत गायन करते. ती गुणाकडून सारंगी वाजवायला शिकते. तसेच गुणाला संसारात कसे वागायचे लोकांच्या भावना कशा ओळखायच्या हे शिकवते. तिचे गुणावर प्रेम आहे. गुणा जेव्हा मित्राच्या शोधात घराबाहेर पडतो त्यावेळी ती त्याला अडवत  नाही. तिला कर्तव्यापायी मोह झुगारणाऱ्या गुणाचा अभिमान आहे.

गोड शेवट कादंबरीतील दयाराम भारती हे साने गुरुजींचे जणू प्रतिबिंब आहेत. खादीचे सेवक दया भारती यांच्या हातात झाडू व खिशात टकळी असते. गावोगावी जाऊन स्वच्छता करणे, इतरांना टकळी चालवायला शिकवणे मुलांना गाणी शिकवणे व कीर्तनाच्या माध्यमातून जनप्रबोधन करणे हेच त्याचे दिवसभराचे काम असते. मृत्युमुखी असताना सुद्धा श्रमणाऱ्यांची व गरिबांची मदत करणे ते सोडत नाही. त्यांची स्थिती सुधारावी व त्यांची होणारी पिळवणूक दूर व्हावी यासाठी झटतात.

## ३.३.४ संध्या

'संध्या' ही कादंबरी साम्यवादी क्रांतिकारी ची पत्नी संध्या हीची जीवनकहाणी आहे. संध्या ही स्वच्छतेची भोक्ती आहे. तिला सगळी कामे स्वच्छ व नीटनेटकेपणाने करायला आवडतात. आजीच्या व वडिलांच्या मृत्यूनंतर तिला अकाली प्रौढत्व येते. ती गावातील मुलांसाठी प्रभात फेऱ्या काढते. पहिल्याच भेटीत तिचे कल्याण वरती प्रेम जडते. कल्याण हा कितीही गरीब असला तरीही ती त्याला आयुष्यभर साथ देते. कल्याण क्रांतिकारी असल्यामुळे तिच्याकडे जास्त लक्ष देऊ शकत नाही. तरीही ती संसाराचा गाडा सांभाळते. पुढे कल्याणला अटक झाल्यानंतर तीही स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होते.

कल्याण हे या कादंबरीतील सर्वात महत्त्वाचे पात्र आहे. कल्याण हा एक ध्येयवादी तरुण आहे. त्याला शिक्षणाची ओढ असते परंतु पुणे मुंबई सारख्या शहरात जाऊन तो जेव्हा कामगारांची अवस्था बघतो तेव्हा त्यांच्या प्रति त्याच्या मनात दया निर्माण होते तुरुंगवासात असताना तो खूप वाचन करतो. कल्याण हा क्रांतिकारी असून तो काँग्रेसच्या विरोधात विचार करतो. साम्यवादी क्रांतीचा पुढाकार घेतो. कामगार चळवळीत सहभागी होत असताना व संप करत असताना त्याला अनेक वेळा तुरुंगवासात जावे लागते.

कल्याणच्या विपरीत भाईजी हे पात्र या कादंबरीत आले आहे पूर्णतः गांधीवादाचा पुरस्कार करणारे भाईजी कल्याण त्यांच्या विचाराच्या विरोधात असतानाही त्याची मदत करतात. गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना संघटित करतात. कल्याण व भाईजी या दोन पत्राच्या माध्यमातून लेखकाने गांधीवाद व साम्यवाद यांच्यातील भेद लक्षात आणून दिला आहे.

## ३.३.५ चित्रकार रंगा

चित्रकार रंगा ही कादंबरी एका कलाकाराची जीवन सांगते. श्रीरंग म्हणजेच रंगा हे या कादंबरीचे प्रमुख पात्र आहे. जन्मजात चित्रकलेची प्रतिभा घेऊन आलेला रंगा स्वभावाने खूप धीट असतो. शिक्षणात त्याचे मन लागत नाही. पण चित्रकला खूप आवडीने करतो. शाळेत जाऊन मास्तरांची चित्र काढतो. आई वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर जेव्हा तो वासू काकांकडे राहायला जातो तेव्हा  वासू काका त्याला चित्रकलेकडे एका वेगळ्या दृष्टिकोनाने पाहायला शिकवतात. तो आपल्या कलेतून भारताचा गौरवशाली इतिहास, भारतीय संस्कृती, स्वदेशी, खादीचा वापर यासारखे विषय रेखाटतो. दुधगावला भारत चित्रकला धाम याचे निर्माण करावे ही त्याची इच्छा मृत्यूमुळे अपूर्ण राहते.

नयना ही रंगाची बायको. तीही कलाप्रेमी आहे रंगाने काढलेली चित्रे पाहूनच तिचे रंगावर प्रेम जडले आहे. ती रंगाच्या आईला आपल्या मातेसमानस मानते. ती श्रीमंत असल्यामुळे सुरुवातीला रंगाला श्रीमंत हो नाहीतर वडील आपला हात तुझ्या हाती देणार नाही असे म्हणते. परंतु नंतर रंगाबरोबर गरीबीतच दिवस काढायचे ठरवते. रंगा खूप आजारी असताना सुद्धा त्याच्याबरोबर विवाह करते. रंगाचे अपूर्ण राहिलेले भारत चित्रकला धाम हे स्वप्न ती पूर्ण करते.

वासू काका हे खूप दयाळू स्वभावाचे शिक्षक आहेत त्यांना स्वतःचे अपत्य नसते. शेजार पाजारच्या मुलांना ते स्वतःच्या मुलांप्रमाणे वागवतात. रंगाचाही ते त्याच्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर स्वतःच्याच मुलाप्रमाणे सांभाळ करतात.

## ३.३.६ धडपडणारी मुले

धडपडणारी मुले ही स्वामीजींनी घडविलेल्या व समाजासाठी धडपडणाऱ्या मुलांची कहाणी आहे. स्वामीजी हे या कादंबरीतील प्रमुख पात्र आहेत. धिप्पाड व तेजस्वी शरीरयष्टीचे स्वामीजी हे स्वभावाने साने गुरुजींची मूर्ती म्हणूनच आले आहेत. ते देशभक्तीपर व्याख्यान करत व अभंग म्हणत. ते भारत भ्रमण करतात. मनाला वाटेल तेथे जातात. त्यांना कोठलेच बंधन आवडत नाही. मात्र मुलांचे बंधन ते टाळू शकत नाहीत. असेच ते अमळनेर येथील गोपाळरावांच्या छात्रालयातील मुलांच्या बंधनात अडकून राहतात. तेथील विद्यार्थ्यांना खादीचे, स्वच्छतेचे व समतेचे धडे देतात. छात्रालयातील विद्यार्थ्यांसाठी पहाटे उठून ते दैनिक लिहीतात.

रघुनाथ हा किडकिदित व काळे सावळे शरीरयष्टीचा कष्टकरी असा अमळनेरच्या छात्रालयातील गोपाळ रावांचा विद्यार्थी व पुढे जाऊन स्वामीजींचा शिष्य. रघुनाथ हा खूप चिकित्सक स्वभावाचा विद्यार्थी आहे. म्हणून नेहमी विचारमग्न असतो. स्वामीजींना प्रश्न विचारत असतो. तो अमळनेरला छात्रालयात राहतो. आपल्या गावातील आई व बहिणी विषयी त्याला खूप प्रेम आहे. स्वच्छतेची आवड असल्याने स्वामींबरोबर स्वच्छतेची कामे करतो. तसेच स्वामीजी आजारी असताना त्यांचीही सेवा करतो. त्यांनी सुरू केलेले दैनिक लिहायचे काम चालू ठेवतो.

नामदेव हा देखील छात्रालयातील विद्यार्थी स्वामींचा शिष्य व रघुनाथचा मित्र आहे. स्वच्छ व साधे मन असलेला नामदेव खूप सुंदर चित्रे काढतो. बासरी वाचवतो व गाणे गातो. नामदेव फार बोलत जरी नसला तरीही आपल्या कलेतून भावना प्रकट करायला त्याला कळतात. त्याचे वडील सत्यशोधक पंथात होते म्हणून त्याच्यावर लोकमान्य टिळक व स्वामी विवेकानंद यांचा प्रभाव आहे. त्याच्या खोलीत टिळकांचे गीतारहस्य आहे तसेच भिंतीवर

विवेकानंदांचे फोटो टांगलेले आहेत. त्याच्यावर स्वामीजींचाही खूप प्रभाव झालेला आहे त्यांच्याबरोबर तो ग्राम स्वच्छतेसाठी व दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी राबतो व स्वामीजी आजारी असतात तेव्हा त्यांची सेवा करतो.

गोपाळराव हे अत्यंत निर्भीड, स्पष्ट बोलणारे व  हुशार बुद्धिमत्तेचे शिक्षक आहेत. अमळनेर येथे ते विद्यार्थ्यांसाठी छात्रालय चालवतात जेथे ते विद्यार्थ्यांना चांगले संस्कार व नवविचारांचा संदेश देतात. भारत भ्रमंती करत असताना जेव्हा स्वामीजी अमळनेर येथे पोहोचतात तेव्हा त्यांना ते छात्रालयातला राहून विद्यार्थ्यांना चांगली शिकवण देण्यासाठी सांगतात. ते अमळनेरच्या इंग्रजी शाळेत गणित व शास्त्र हे विषय शिकवतात. खूप विचारवंत व कुशाग्र बुद्धीचे असून सुद्धा ते जरा निराशावादीच आहेत. जगाकडून त्यांना फारशी अपेक्षा नाही. जगाबद्दल नेहमीच वाईट मत व्यक्त करतात. लोकमान्य टिळक महात्मा गांधी यांच्या बद्दल त्याला फार श्रद्धा आहे स्वदेशाबद्दलही मनात खूप अभिमान आहे. त्यांना आपल्या सामाजिक कर्तव्याची जाण आहे म्हणूनच एकदा एकाहेतीन ताप असून सुद्धा ते वर्गात शिकवायला जातात. स्वामीजी त्यांना जगाकडे बघण्याचा एक नवीन दृष्टिकोन देतात.

या कादंबरीतील एक महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा म्हणजे वेणू. वेणू ही रघुनाथ ची बहिण आहे. ती शाळेत शिकायला जात नाही परंतु रघुनाथ जी पुस्तक पाठवतो ते आवडीने वाचते. अचानकच लहान वयात तिची दृष्टी जाते पण तरीही ती निराश न होता स्वामीजींना समाजसेवेत मदत करते सेवा दलाच्या मिरवणुकीत त्यांना हातभार लावते.

यशवंत नावाचा एक जहागीरदाराचा मुलगा छात्रालयात शिकतो. अमीरित जगलेला व पैशांचा माज असलेला यशवंत स्वामीजींच्या सानिध्यात पूर्णपणे बदलतो. विलायती कापडे सोडून खादी वस्त्र परिधान करतो. साने गुरुजींनी या पात्राच्या माध्यमातून श्रीमंतांचा पैसा कसा सत्कर्मी लावता येतो व श्रीमंत समाजात बदल आणण्यासाठी मोलाचा वाटा घेऊ शकतात हे सांगू इच्छिले आहे.

## ३.३.७ सती

सती या कादंबरीतील प्रमुख नाईका ही मैना आहे. साने गुरुजींनी ही व्यक्तिरेखा जन्मजात हुशार निर्माण केली आहे. या पात्राच्या माध्यमातून लेखकाने स्त्री जातीची व्यथा मांडलेली आहे. सती ही कादंबरी जरठकुमारी विवाहाचे घोर परिणाम दाखवणारी असून मैना हे पात्र जरठकुमारी विवाह प्रथेचा शिकार बनली आहे. मैना लहानपणीच पोहायला शिकते. स्तोत्र पाठांतर करणे यासारख्या गोष्टी शिकते. तिला स्वतःला कोणी भित्री म्हटलेले आवडत नाही. ती पुरुषा इतकीच सशक्त व कणखर आहे. परंतु एक स्त्री म्हणून तिच्यातील वेगळेपणा कायम ठेवण्यासाठी मैना आजोळी गावला जाऊन विनयाने वागायला शिकते अशी परिस्थिती लेखकाने निर्माण केली आहे. ती आजोळीला फार हसू नये, फार बोलू नये हे शिकते. मैना ही एक दानशूर व विरक्त स्त्री आहे. स्वतःच्या भावाच्या उज्वल भविष्यासाठी गोपाळवर प्रेम असून सुद्धा ती वडीलांनी आणलेल्या स्थळासाठी नकार देत नाही, व लग्न झालेल्या जरठ पतीशी समर्पित राहते. त्याच्या मृत्यूनंतर स्वतः सती जाते.

गोपाळ हा अंजनी नदीच्या तीरावर पडक्या शिवालयात राहणारा एक बालयोगी आहे. तो गावात माधुकरी मागून उदरनिर्वाह करतो. स्तोत्र, वेद, उपनिषद यांचे त्याला ज्ञान आहे. या सर्व गोष्टी तो खूप सुलभ करून दुसऱ्यांना शिकवतो. गोपाळ संन्यासी असून सुद्धा मैनेच्या प्रेमात पडतो. पण मैनेचे लग्न वासुदेवरावांबरोबर ठरले आहे हे जाणल्यानंतर खूप दुःखी होतो. त्याचा देवावरचा विश्वास उठतो. शेवटी मैना ज्यावेळी नवऱ्यासोबत सती जात असते त्यावेळी तोही त्याच चितेवर पुढे घेऊन स्वतःचा जीवन संपवितो.

सती या कादंबरीतील मैनेचा पती वासुदेवराव हा समाजातील चैनी व लहरी माणसांचे प्रतीक म्हणून आला आहे. पैशांची उधळपट्टी करणाऱ्या वासुदेवरावांच्या आधीच तीन बायका असतात. तीनही बायकांपासून मुलं न

झाल्यामुळे तो वृद्धावस्थेत चौथे लग्न करतो. लहरी स्वभाव असल्यामुळे वासुदेवराव कधी मैनेसोबत अंगात भूत आल्यासारखा वागतो तर कधी तिला गुरु मानून तिच्या पाया पडतो. तसेच चैनी स्वभाव असल्यामुळे कर्जबाजारी होतो.

सारंग गावचे धोंडोपंत हे मैनेचे वडील आहेत. चांगले उत्पन्न असणाऱ्या धोंडोपंतांना वेद पुराणांचे ज्ञान आहे. आपल्या रसाळ वाणीने ते पुराण सोपे करून इतरांना सांगतात. परंतु दहा हजारांच्या बदल्यात स्वतःचा मुलीचा वृद्ध गोपाळरावाबरोबर लग्न लावून देतात. याच गोष्टीवरून साने गुरुजींनी माणसाच्या ज्ञान आणि कर्म यामधील विसंगती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.३.८ नवा प्रयोग

नवा प्रयोग या कादंबरीतील महत्वाची पात्रे ही साने गुरुजी यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारी आहेत. त्यांच्या मनात काहीतरी प्रयोग करून समाजात परिवर्तन आणण्याची इच्छा आहे. सखाराम हे फकीरा वृत्तीचे, खादीचे वस्त्र वापरणारे व डोळ्यांना चष्मा अशा पेहरावाचे घनश्याम याचे परममित्र आहेत. त्यांच्या मनात गरीब व कष्टकरी समाजाप्रती दया आहे स्वतःच्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह करून द्यायची त्यांची इच्छा आहे. कामगारांच्या प्रति मनात तळमळ असल्यामुळे ते आपल्या बहिण मालतीसहित कामगारांच्या संपात सहभागी होतात.

घनश्याम हा सुंदरपुरच्या भारतीय संस्कृती मंदिराचा एक विद्यार्थी आहे. गरीब व गरजू लोकांच्या मदतीला धावून जाणे हा त्याचा स्वाभाविक गुणधर्म आहे. वृद्ध गणाची झोपडी पावसात गळत असते म्हणून तो त्याला स्वतःच्या खोलीत आसरा देतो. त्याचा लहान मुलगा रूपला याला शिकवतो. सखाराम प्रमाणेच तोही भारतीय संस्कृती मंदिरातून

वैचारिक मतभेद निर्माण झाल्यामुळे निघून जातो. परंतु सत्कर्म करणे सोडत नाही. मुलांना घेऊन साफसफाई करणे, शाळेतील संडास साफ करणे, गरीब जनतेला एकजुट व्हायला शिकवणे, त्यांना स्वाभिमानी व्हायला शिकवणे हे कार्य चालूच ठेवतो. घनश्याम हे पात्र देखील साने गुरुजींच्या प्रवृत्तीचे एक प्रतिबिंब आहे. जिथे जाईल तिथे चैतन्य निर्माण करणारे असे हे पात्र आहे.

ह्या कादंबरीत मालती ही महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. स्वतःच्या लग्नापेक्षा दरिद्री लोकांसाठी काम करणे हे तिला जास्त महत्त्वाचे वाटते. ती आपल्या भावाला समाजसेवेत मदत करते. खेड्यातील स्त्रियांना लिहायला वाचायला शिकवते लहान मुलांना चांगली गाणी शिकवते. तसेच गावात प्रौढ साक्षरतेचे वर्गही सुरू करते.

### ३.३.९ रामाचा शेला

रामाचा शीला ही साने गुरुजींची कादंबरी बालविवाह बद्दलचे मत व्यक्त करते. सरलाच्या जन्मानंतर तिच्या आईचा मृत्यू व असेच अनेक वाईट प्रसंग घडतात. ज्यामुळे तिला अपशकुनी किंवा पांढऱ्या पायांची समजले जाते. वडीलही तिचा द्वेष करतात. सरला शिक्षण घ्यायची इच्छा असते परंतु तिचे शिक्षण बंद करून बाबा लहान वयातच तिचे लग्न ठरवतात. सरला मात्र अभागनी ठरते. लग्नाच्या पंधरा दिवसातच तिच्या पतीचा मृत्यू होतो. याचेही खापर सासू-सासरे तिच्याच नावावर फोडतात व तिला घराबाहेर काढतात. पुढे जेव्हा सरला व उदय एकमेकांवर प्रेम करू लागतात त्यावेळी उद्यापासून तिला दिवस जातात हे वडिलांना सांगण्याचे धाडस होत नसल्याने ती पंढरपूरला निघून जाते. कठोरपणे मुलाला अनाथामात ठेवून उदयचा शोध घेऊ लागते .

नाशिक येथे तिची फसवणूक करून तिला कुंटणखान्यात नेले जाते. तिथे खूप परिश्रमाने ती गप्पूशेट याचे आपल्या पवित्र विचारांच्या मदतीने मनपरिवर्तन करते व हुशारीने तिथून सुटून जाते. एका स्त्रीच्या आयुष्यात दु:ख हे कुठल्याही मार्गाने येऊ शकते याचेच उदाहरण सरला हे पात्र आहे आणि स्त्री कणखरपणे त्यात दु:खाला सामोरे जाऊ शकते हेच साने गुरुजींना या पात्राच्या माध्यमातून सांगावयाचे आहे.

ह्या कादंबरीतील उदय हे खूप महत्त्वाचे पात्र आहे. उदय हा लहानपणापासून गरिबीत पण स्वाभिमानाने वागणारा असा तरुण आहे. लहानपणीच वडील वारल्यामुळे आईच त्याचा सांभाळ करते. पुढे तो सरलाच्या प्रेमात पडतो. ज्यावेळी त्याच्या आईचा मृत्यू होतो व तिची चीता जळत असते त्या दु:खातच तो बेशुद्ध होतो व त्याची स्मृती जाते. काही केल्यास स्मृती परत येत नसते. परंतु सरलाचा फोटो बघितल्याबरोबर त्याची स्मृती परत येते तो सरलेच्या शोधात पुण्यात जातो पण तिथे सरला न भेटल्यामुळे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. त्याचा एक मित्र त्याला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करतो. पुढे तो एक समाजसेवक म्हणून आपले बाकी आयुष्य घालवितो. हरिजनांची सेवा करतो खादी बद्दल त्याच्या मनात आदर असतो म्हणून खादीचे शिक्षण घेतो.

विश्वासराव हे सरलीचे वडील असून आपल्या शंखेकोर स्वभावामुळे सरलेचा तिरस्कार करतात. घरात घडणाऱ्या वाईट गोष्टींसाठी सरलेला जबाबदार ठरवतात उतरत्या वयात पुन्हा लग्न करतात. मात्र विधवा मुलीच्या पुनर्विवाहाचा विचार  करत नाहीत. रमाबाईचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे मन परिवर्तन होते व ते सरला व उदय यांच्या नात्याला मान्यता देतात.

या कादंबरीत साने गुरुजींनी रामभटजी  पात्राच्या माध्यमातून पुजाऱ्यांच्या ढोंगी व लबाडपणा वृत्तीचे दर्शन समाजाला करून दिले आहे.  सकाळी देवाची पूजा व रात्री कुंटणखान्यातून दलाली मिळवणे हे त्यांचे कर्म आहे.

## ३.३.१० दिगंबर राय

दिगंबर राय ह्या कादंबरीत प्रमुख पात्राचे नाव कादंबरीचे शीर्षक म्हणून निवडण्यात आले आहे. दिगंबर राय हे अत्यंत तेजस्वी असे व्यक्तिमत्व आहे. ते खूप श्रीमंत जमीनदार असून सुद्धा त्यांना त्यांच्या पैशांचा अहंकार नाही ते अत्यंत धार्मिक, मदतीच्या हाकेला धावून जाणारे, समतेचा आणि बंधू भावाचा पुरस्कार करणारे व अडीअडचणीत कामी येणारे इसम आहेत. त्यांना स्वदेशी वस्तू विषयी खूपच आत्मीयता आहे. श्रीमंत असून देखील ते देशी सुताचे कपडे वापरतात. मुलाने आणलेल्या विदेशी तापळाला आग लावतात व मुलाच्या लग्नासाठी त्यांना रखालकडून देशी सुताचे कपडे शिवून घेतात. यामुळेच रखालला ब्रिटिश सरकार शिक्षा करतात. रखायची यात काहीच चूक नाही आणि सगळं गुन्हा आपल्या अंगी घेऊन ते स्वतःला अटक करून घेतात आणि कारावासातच त्यांचा अंत होतो.

स्नेहमयी ही दिगंबर रायांची पत्नी असते. ती खूप कष्टाळू व निश्चयी असते दिगंबर रायांना तुरुंगवास झाल्यानंतर त्यांना सोडवण्याचा अतोनात अपयशी प्रयत्न करते. शेवटी दिगंबर रायांचा तुरुंग वासातच अंत झाल्यानंतर ती स्वतःच्याही प्राणांचा त्याग करते.

राखाल हा दिगंबर राय कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र आहे. स्वाभिमानी व देशाभिमानी असा राखाल फक्त देशी सुत विणतो आणि त्यावरच आपला उदरनिर्वाह करतो. अमीर लोकांचे लग्नाचे वस्त्र तो विणत असतो. जेव्हा त्याच्यावर विलायती सूत विणण्याची वेळ येते तेव्हा परकीय सूत असल्यामुळे ते मी कधीच विणणार नाही अशी प्रतिज्ञा घेतो आणि विणण्याचे काम सोडून शेतात काम करण्यासाठी हातात नांगर धरतो. तो इंग्रज सरकारच्या विरोधात जाऊन दिगंबर रायांच्या मुलांच्या लग्नासाठी देसी सुताचे कपडे विणून देतो ज्यासाठी त्याला फाशीची शिक्षा होते आणि तीला सुद्धा तो निर्भयपणे सामोरे जातो.

## ३.३.११ दीनबंधू

दीनबंधू ही एक सामाजिक स्वरूपाची कादंबरी असून या कादंबरीतील सर्व महत्त्वाची पात्रे ही समाजसेवेचा हेतू घेऊनच कादंबरीत आलेले आहे. बाबूशेठचे मूळ नाव दीपचंद आहे. परंतु श्रीमंताच्या कडे दत्तकविधान झाल्याने बाबूशेठ या नावाने ओळखला जातो युवक. तो श्रीमंतीचा द्वेष करतो. आपण गरिबांबरोबर रहावे, त्यांना मदत करावी, त्यांच्यात मिळून मिसळून वागावे असे त्याला वाटते. सोनखेड्याच्या आश्रमाला जाऊन तो तिथली सर्व खादी विकत घेतो. आश्रमातील मंडळींना भाऊबीजेची भेट म्हणून गळ्यातील कंठी काढून देतो. शांतिनिकेतनमध्ये जाऊन बंगाली भाषेचा अभ्यास करतो. बंगालमध्ये स्वतःचे नाव स्वयंसेवक म्हणून नोंदवितो. विलासपुरला दवाखाना काढतो. गरिबांचा संसार सुखी व्हावा रिकाम्या हातांना काम मिळावे म्हणून बाबू आपल्या संपत्तीचा वाटा खादी आश्रमाला दान करतो. त्यामुळेच त्याला जनतेकडून दीनबंधू ही उपाधी मिळते.

बाबुला सत्कर्म व परोपकार करायला शिकवणारे त्र्यंबकराव हे त्याचे गुरु आहेत. सदैव मिळून मिसळून राहणारे व दुसऱ्यांना उपयोगी पडणारे ते गृहस्थ आहेत. मुलांवरती चांगले संस्कार घडवणे हेच शिक्षण आहे असे त्यांचे ठाम मत आहे. ते मुलांना इतिहास व भाषा शिकवत असतानाच विविध भाषेतील अनेक महत्त्वाच्या विषयावरील लेख वाचून दाखवतात. विविध उदाहरणे देऊन मुलांना चांगली शिकवण देतात. मोठ मोठ्या लेखकांचा मुलांना परिचय करून देतात. ऊन पावसाची तमान बाळगता ते हिंडून फिरून खादीचा प्रचार व प्रसार करतात.

## ३.४ भाशाशैली

साने गुरुजी यांच्या कादंबरीतील भाषा ही खूप साधी, सोपी, छोटी छोटी वाक्य रचना असलेली व सहजपणे प्रकट झालेली आहे. कादंबरीच्या भाषेवरून लेखकाची लेखनामागील तळमळ सहजपणे स्पष्ट होते. आपल्या अंतरंगातील ओलावा त्यांनी भाषेत ओतला आहे. म्हणूनच गुरुजींची भाषाशैली संवेदनशील व्यक्तीच्या मनाचा ठाव नक्कीच येऊ शकते.

साधी सरळ परंतु ओघवती भाषा, मनातील भावनांचे प्रकटीकरण करून किशोरांवर संस्कार करू पाहते. कादंबरीत अनेकदा साने गुरुजींचे कवीहृदय डोकावते. सुभाषिते, काव्यपंक्त्या, श्लोक, अभंग औचित्य साधून आलेले आहेत.

**“देवाचे मजूर । आम्ही देवाचे मजूर ।**

**कष्ट करू भरपूर ।। आम्ही देवाचे मजूर ।।**

**बाहेरील ही शेती करून**

**धनधान्याने तिला नटवून**

**फुलाफळांनी तिला हसवून**

**दुष्काळा करू दूर ।। आम्ही. ।।“** ( काव्य पंक्ती उदाहरण, संध्या, पृ. ३२,३३)

**“न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।”** ( संस्कृत श्लोक उदाहरण, नवा प्रयोग, पृ. ३८)

**गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वति**

**नर्मदे सिंधुकावेरि जलेऽस्मिन् संनिधि कुरु** (श्लोक उदाहरण, क्रांति पृ.   ३८)

**“येई गा तू येई गा तू पंढरीच्या राया ।**

**तुजवीण शीण वाटे दीन झाली काया ।।** (अभंग उदाहरण, रामचा शेला, पृ. ७४)

कादंबरीत म्हणी व वाक्यप्रचार सुद्धा सहज व सोपे आहेत. जे पेरेल ते उगेल, हसतील त्याचे दात दिसतील, बोलाचीच कढी अन बोलाचाच भात, देव तारी त्याला कोण मारी, देव देतो कर्म नेते, नाकापेक्षा मोती जड, यासारख्या अनेक म्हणी कादंबरी लेखनातून दिसून येतात. तोंडचे पाणी नेणे, तोंड काळवंडले, पदरात घेणे, नखाची सर,  हृदयाला पाझर फुटणे, नाक घासणे, हृदयाचे पाणी पाणी होणे यासारखे वाक्प्रचार कादंबरीतून अविष्कृत झाले आहे.  अशाप्रकारे म्हणी व वाक्प्रचारांचा वापर करून लिहिलेली भाषा खूप समृद्ध वाटते.

कादंबरी लेखनातील भाषेचे विशेष सांगत असताना एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कादंबरीत शिव्यांचा वापर कुठेही झालेला नाही. अनेक कादंबरींना ग्रामीण पार्श्वभूमी लाभली असता पात्रांच्या भाषेतील सहजता दाखवण्यासाठी

शिव्यांचा वापर करणे स्वाभाविक वाटू शकते परंतु साने गुरुजींनी वाचक वर्गाचे भान ठेवले आहे. कादंबरीत येणारे अपशब्द खूप सामान्य पातळीचे आहेत. विषारी सापा, आग लाव्या, अश्या स्वरूपाचे अपशब्द कादंबरीमध्ये आलेले आहेत.

एकूणच सांगावयाचे झाले तर साने गुरुजी यांच्या कादंबरीतील भाषा खूप प्रभाव टाकणारी आहे. सुटसुटीत व साध्या सोप्या वाक्यामुळे प्रवाहीपणा दिसून येतो, "सान्यांची भाषा सुंदर नाही, पण तिच्यात एक प्रकारचा गोडवा आहे. जणू आईने मुलाशी गुजगोष्टी कराव्या तसे ते लिहितात. त्यांच्या विषय प्रतिपादनाची पार्श्वभूमी वैचारिक प्रेरकता नाही. पण तिची जागा आर्ततेने घेतली आहे आणि अशा सर्व गुणांच्या जोडीला सर्व वाङ्मयातून एक विशिष्ट प्रकारच्या उद्दात्तेतेची झुळूक वाचकाला अंखड सुखवीत असते. "अत्तराचा उग्र सुगंध सान्यांच्या वाङ्मयात फारसा आढळत नाही. मात्र स्वतः जळून जगाला सुगंधीत करणा-या उदबत्तीची आठवण ते पावलोपावली करून देतात" असे वि. स. खांडेकर यांनी म्हटलेले आहे.

## ३.५ निवेदन पद्धती

साने गुरुजी यांच्या एकूण कादंबरी लेखनात प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी या दोन्ही स्वरूपाचे निवेदन आहे. त्यांच्या आत्मचरित्रपर कादंबऱ्यांना प्रथम पुरुषी निवेदन लाभलेले आहे. मात्र प्रबंधिकेतील सर्व निवडक कादंबऱ्यांचे निवेदन हे तृतीय पुरुषी आहे. या निवेदनात तो, ती, त्या, त्याचे, त्याला, त्याने, असे संबोधन निवेदन केलेले आहे. तृतीय पुरुषी निवेदनात प्रथम पुरुषी निवेदनापेक्षा गौणपात्रांना अधिक महत्त्व असते. कारण निवेदक हा प्रमुख आणि गौण या दोन्ही पात्रांना पूर्णपणे ओळखत असतो. ही पात्रे त्यांनीच निर्माण केलेली असतात. साने गुरुजींच्या कादंबरीत येणाऱ्या प्रमुख

पात्राप्रमाणे गौणपात्रांनाही खूप महत्त्व आहे. प्रत्येक पात्र काही ना काही विचार घेऊन आलेले आहे. याच कारणामुळे लेखकाने या सर्व कादंबऱ्यांसाठी तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केल्याचे दिसून येते. लेखकाच्या प्रभावी व सहज सोप्या भाषेमुळेच निवेदन प्रभावी वाटते.

**"काशीचे हे पहिले बाळंतपण. ती माहेरी आली होती. तिचे दिवस भरत आले होते. आईबापांचे तिच्यावर फार प्रेम होते. तिची प्रत्येक हौस पुरविली जाई. माहेरी श्रीमंती होती अशातला भाग नाही. काशीचे वडील एका सावकाराकडे मुनीम होते. त्यांचे लहानसे घर होते. फुलांचा त्यांना फार नाद. किती तरी फुलझाडे घराभोवती होती. काशी आणि तिचा मोठा भाऊ काशिनाथ, दोघेच भावंडे. काशिनाथ पुण्याला नुकताच नोकरीस लागला होता. मागच्या वर्षी त्याचे लग्न झाले होते. त्याची पत्नीही माहेरी बाळंतपणाला गेली होती. तिचे माहेर तिकडे लांब सांगलीकडे होते."** (तृतीय पुरुषी निवेदनाचे उदाहरण, चित्रकार रंगा, पृ. १)

## ३.६ वातावरण निर्मिती

साने गुरुजींच्या छोट्या छोट्या वाक्यामुळे भाषा आकर्षक बनली आहे. प्रसंगांची निर्मिती, सुंदर व्यक्तीचित्रे तसेच त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये हे साने गुरुजींच्या कादंबऱ्यांच्या वातावरण निर्मितीचे विशेष आहेत. स्त्रियांच्या, कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या दुःखाचे प्रकटीकरण करताना कुठेही अतिशयोक्ती वाटत नाही.

**“परंतु एक गाठोडे होते त्या ट्रंकेत. कल्याणने ते सोडले. तो त्यातून काय बाहेर पडले? चिमण्या, आशेच्या चिमण्या उडून गेल्या होत्या. चिंध्यांच्या निर्जीव चिमण्या तेथे समोर होत्या. एका चांदव्याला त्या आणि ती आंगडीटोपडी, अरेरे! ते गाठोडे म्हणजे संध्येचे आशास्थान होते. तिची सारी स्वप्ने त्या साठवून ठेवलेली होती. तिचे मंगल मातृत्व त्यात सामावलेले होते. कल्याणच्या डोळ्यांतून पाणी घळघळू लागले. उद्या संध्या घरी आली व तिने जर हे सारे पाहिले, तर तिला काय वाटेल? ही दुपटी, या चिमण्या, ही आंगडीटोपडी पाहून तिचे हृदय फाटेल. तिच्या हृदयाच्या चिंध्या होतील. त्या हृदयाच्या चिंध्या पुन्हा कोण शिवील? ते भग्न विदीर्ण हृदय कोण शांतवील? त्या हृदयात पुन्हा कोण आनंद आणील, कोण तिथे पुन्हा आशेची पाखरे खेळवील?”** (संध्या पृ. २४७)

साने गुरुजी हे कोमल मनाचे असल्याने त्यांना निसर्गाची खूप ओढ होती. त्यांना निसर्ग खूप आवडायचा. कादंबरी लेखन करत असताना त्यांनी निसर्गाचे वर्णनही सुंदरपणे केले आहे.

**“रंगाला दूधगाव आवडले, नदीकाठचा देखावा नयनमनोहर असे. आजूबाजूला वृक्षाच्छादित टेकड्या होत्या. त्या जंगलात मोर होते, वानर होते. रंगा कधी कधी एकटाच बनराजीत जाई आणि वनदेवतेचा जणू बाळ होऊन तेथे बसे. त्याला कधी भय बांटत नसे. तो नदीच्या डोहात पोहायचा. त्याला त्यावेळेस पंढरीची आठवण येई.”** (चित्रकार रंगा, पृ. २४)

**“वसंतऋतूचा बहर होता. झाडांना नवीन पल्लव फुटले होते. पळस फुलून लाल झाले होते. पानांच्या आधी त्यांना फुले आली होती. आणि आंबे, फणस, काजू, करवंदे, जांभळे, कोकंब सर्व फळांना जसा**

**ऊत आला होता. सृष्टीचे रंगवैभव जिकडेतिकडे दिसून येत होते. मध्येच ती कोकिळा कूऊ कूऊ करी आणि लाजून झाडाच्या पानात लपे."** (चित्रकार रंगा, पृ. २)

वातावरण हे फक्त कथानकाचे व घटना प्रसंगांचीच पार्श्वभूमी सांगत नाही तर माणसांची पार्श्वभूमी सुद्धा सांगते. कादंबरीत येणाऱ्या प्रत्येक पात्राच्या क्रिया व प्रतिक्रियांचा कार्यकारण भाव लेखकांनी निर्माण केलेल्या वातावरणातूनच सिद्ध होत असतो. लेखक कुठल्याही पात्राचे वर्णन व त्याची स्वभाव वैशिष्ट्ये सांगत असतो. या स्वभाव वैशिष्ट्यावरूनच त्या पात्रांची संवाद व कृती यामागील संदर्भ स्पष्ट होत असतो. त्याच प्रकारे व्यक्तिरेखांच्या तोंडून येणाऱ्या संवादातून देखील माणसाचे गुणधर्म समजू शकतात.

**"अन्नाच्या भुकेत विचारांची भूक येऊन मिळाली म्हणजे क्रांती होते. साधी अन्नाची भूक भीक निर्माण करते. परंतु विचारांची जोड मिळालेली अन्नाची भूक साम्राज्ये धुळीत मिळविते".** (क्रांती पृ. ४२) या संवादातून पात्राच्या क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचे पडसाद उमटतात.

**"आणि तेथे बाळाला मांडीवर घेऊन काशी बसली. आकाशात रंगपंचमी होती. ढगावर रंग पडून अनेक रमणीय प्रकार तेथे दिसत होते, नदीचे पाणीही लालसर पिवळसर दिसत होते. तो लहानगा रंगा वरच्या रंगसृष्टीकडे टपोऱ्या काळ्या भोर डोळ्यांनी पाहात होता."**

**"बाळ वाढत होता. त्याचे रडू थांबवायची एक युक्ती असे. रंगीत खेळणी, रंगीत फुगे, रंगारंगांची फुले दाखवली की त्याचे रडे थांबायचे. त्या लहान बाळाची जणू समाधी लागे. आनंदराव एक वकिलाकडे कारकून होते. सायंकाळी घरी आल्यावर ते बाळाला घेत, हिंडवीत. कधी त्याला सार्वजनिक बागेत नेत, कारंजे दाखवीत, फुले दाखवीत. रविवारी त्याला ते घरी खेळवायचे, बोळकी रचायचे, रंगांचे तुकडे**

**जोडायचे. बघे बघे नि रंगा एकदम हात मारून सारे पाडी नि हसे. रंगाला फुलपाखरे, पाखरे म्हणजे केवढी गंमत ! एके दिवशी काशीने पिवळे फुलपाखरू हळूच पकडले नि रंगाजवळ आणले. रंगा बघत राहिला. तिने एकदम सोडताच पटकन् पाखरू गेले वर. रंगाने टाळी वाजवली**." (चित्रकार रंगा, पृ. २,३) ह्या दोन्ही निवेदनाच्या उदाहरणातून पात्राला बलपणापासूनाच रंगांविषयी ओढ आहे हे सांगण्याचा लेखनाचा प्रयत्न आहे. प्रभावी वातावरण निर्मितीसाठी लेखकाची भाषाच कारणीभूत ठरलेले आहे. साने गुरुजींनी त्याकाळच्या सामाजिक प्रश्नांना वातावरणातूनच प्रभावीपणे चित्रीत केले आहे.

## ३.७ समारोप

प्रस्तुत प्रकरणात साने गुरुजींच्या निवडक दहा कादंबऱ्यांची कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, निवेदन पद्धती व वातावरण ह्या कादंबरीच्या पाचही घटकांच्या आधारावर वेगवेगळी चिकित्सा केली आहे. साने गुरुजींच्या सामाजिक व राजकीय कादंबऱ्यांचा विचार करत असताना लेखकाने तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडविले आहे हे समजते. साने गुरुजींच्या साने गुरुजींच्या कादंबरीतील पात्रे ही फक्त कथानकाचा भाग म्हणून नाही तर काहीतरी मूल्यभाव अंगी घेऊन आली आहेत. कादंबरीच्या भाषेत प्रेमाचा अनुबंध आहे. त्यात हळवेपणा आहे. साने गुरुजींची कादंबरी लेखनातून समाजात परिवर्तन आणण्याची असलेली तळमळ स्पष्ट होते. सुटसुटीत भाषेमुळे निवेदन व वातावरण निर्मितीही प्रभावीपणे झालेली आहे.

## ३.८ निष्कर्ष

- साने गुरुजींनी समाजाकडे डोळसपणे पाहून कादंबरी लेखन केले आहे.
- साने गुरुजींनी कादंबरीच्या माध्यमातून आपल्या स्वप्नातील नवभारत अथवा आदर्श भारत वास्तवात येण्यासाठी प्रयत्न केला आहे.
- साने गुरुजींच्या कादंबऱ्या स्त्री मनाचा सूक्ष्मपणे वेध घेतात व स्त्रियांच्या समस्याही मांडतात.
- कादंबरीतून साने गुरुजींचे खादी व स्वदेशी प्रती असलेले प्रेम व निष्ठा स्पष्ट होते.
- कादंबरीच्या कथानकात व पात्रांमध्ये वैविध्य दिसत नाही.
- समाजातील अज्ञानता असाह्यता अन्याय असाक्षरता वाईट चालीरीती अशा प्रकारच्या सामाजिक विषमता दूर करण्यासाठी कादंबरीतील पात्रे आली आहेत.
- साने गुरुजींच्या कादंबरीत विस्मय संघर्ष चमत्कारिक कलाटने आदी प्रयोग झालेले नाहीत. मनोरंजनाच्या हेतूने वाचन करत असताना कादंबरी रटाळ वाटू शकते.
- सरळ सूट कथानकातून कादंबरीचा आशय व्यक्त झाला आहे.
- समाजातील सर्व स्तरातील लोकांना कादंबरीचे स्थान प्राप्त झाले आहे.
- कादंबरीत काही प्रमाणात खलपात्रे आलेले आहेत परंतु परिस्थितीनुरूप त्यांच्यातही बदल होतो.
- साने गुरुजींच्या कादंबरीची भाषा आशयाशी एकरूप झालेली आहे.
- कादंबरीचे निवेदन प्रासादिक भाषेत केले आहे.

- वातावरण निर्मितीतून आणि काही प्रमाणात निसर्ग वर्णनातून आशयाला उठवदार बनवण्याचा प्रयत्न केला आहे.
- कादंबरीच्या एकंदरीत स्वरूपावरून लेखकाच्या ठायी असलेला भाबडेपणा व  कष्टी समाजाप्रती असलेली तळमळ स्पष्ट होते.

## ३.९ संदर्भसूची

**आधार ग्रंथ**

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सहा सती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : आठ संध्या, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : दहा सोन्या मारुती आणि दीनबंधू, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : अकरा क्रांती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : बारा गोड शेवट, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : तेरा रामाचा शेला, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : चौदावा चित्रकार रंगा आणि नवा प्रयोग, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : पंधरा  धडपडणारी मुले, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सतरा पुनर्जन्म, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

# प्रकरण ४ :

# साने गुरुजींच्या कादंबरीतील वैचारिकता

## अनुक्रमणिका

४.१ प्रस्तावना........................................................................................ 71

४.२  साने गुरुजींचे साहित्य निर्मितीचे प्रयोजन.............................................................72

४.३ साने गुरुजींच्या कादंबरीतील राजकीय भूमिका.................................................... 73

४.४ साने गुरुजींच्या कादंबरीतील सामाजिक विचार.....................................................77

४.५ समारोप.......................................................................................... 79

४.६ निष्कर्ष........................................................................................... 80

४.७ संदर्भसूची...........................................................................................81

## ४.१ प्रस्तावना.

साने गुरुजींनी साधारणतः १९३० ते ५० या काळात कादंबरी लेखन केले. मराठी कादंबरीच्या इतिहासात हा कालखंड फडके-खांडेकर युग या नावाने ओळखला जातो. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर हे या काळातील कादंबरीचे प्रवर्तक होते. ज्या काळात कलेसाठी कला व जीवनासाठी कला ह्या दोन्ही विचारांचे वैचारिक मतभेद निर्माण होत होते या काळातच साने गुरुजींनी कादंबरी लेखन केले. साने गुरुजींची कादंबरी तत्कालीन इतर साहित्यिकांच्या कादंबरीपेक्षा खूप वेगळी होती. वास्तविक समाजाला आपल्या कादंबरीतून दाखवण्याचा साने गुरुजींनी प्रयत्न केला. फक्त मनोरंजनासाठी कल्पनारम्य विश्वाचा मनोरा उभारला नाही. त्यांच्या कादंबरीला वैचारिक बैठक लाभलेली आहे. साने गुरुजींनी स्वतःच्या ठाई असलेले विचार प्रतिपादन करण्यासाठीच कादंबरी लेखन केले. किंबहुना कलेच्या माध्यमातून स्वतःच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी कादंबरी लेखन केले हे त्यांच्या कादंबरींच्या एकूणच स्वरूपावरून सहज समजते.

प्रस्थापित साहित्यप्रवाहा विरुद्ध लेखन केल्यामुळे सामान्य जनतेपर्यंत त्यांची कादंबरी पोहोचली. लोकप्रिय झाली. परंतु साहित्य विश्वात  त्यांच्या कादंबरीची उपेक्षा झालेले दिसून येते. साने गुरुजींच्या कादंबरीलेखनाची जी उपेक्षा झाली तिची कारणे अनेक आहेत. पण एक महत्त्वाचे कारण म्हणजे प्रस्थापित प्रवाहातल्या कादंबऱ्यांपासून असणारे साने गुरुजींच्या कादंबऱ्यांचे वेगळेपण होय. “मराठी कादंबरीच्या पहिल्या शतकाची समीक्षा करणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी ‘वेगळ्या वाटेचे कादंबरीकार’ म्हणून साने गुरुजींच्या वेगळेपणाची आवर्जून दखल घेतलेली आहेच, पण त्याचबरोबर ‘अमुक एका पातळीवरच्या व विशिष्ट कलाप्रवृत्तीच्या साहित्याचीच दखल घेण्याचा टीकाकारांचा जो शिरस्ता दिसतो’ त्याविषयी नापसंतीही व्यक्त केलेली आहे.”[१]

साने गुरुजींच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करत असताना जे विचार साहित्यातून मांडण्यासाठी त्यांनी लेखन केले किंवा ज्या विचारामुळे त्यांची कादंबरी इतर कादंबरीकरांपेक्षा वेगळी ठरली ते विचार कोणते होते  समजून घेणे आवश्यक ठरते.

## ४.२ साने गुरुजींचे साहित्य निर्मितीचे प्रयोजन

साने गुरुजींनी ज्या दृष्टिकोनातून साहित्य निर्मितीकडे पाहिले त्या दृष्टिकोनामुळेच त्यांच्या कादंबरी लेखनाला वेगळेपण प्राप्त झाले. साहित्य निर्मिती ही साने गुरुजींसाठी करियर घडविण्यासाठी किंवा एक लेखक म्हणून ओळख प्राप्त करण्यासाठी केलेला प्रयत्न नव्हता. वाचकाच्या दृष्टिकोनातून विचार केला तर साने गुरुजींनी त्यांचे साहित्य फक्त वाचकांचे मनोरंजन व्हावे या हेतूनेही केले नाही. साने गुरुजींनी साहित्य निर्मितीला आपल्या जीवनातील इतर गोष्टींपेक्षा श्रेष्ठत्व दिले नाही अथवा खूप महत्त्वाचेही मानले नाही. “साने गुरुजी हे स्वतःला साहित्यिक किंवा कलावंत मानीत नसत व सहसा साहित्य संमेलनांनाही उपस्थित राहत नसत अशी माहिती त्यांच्या चरित्रकारांनी नमूद करून ठेवलेली आहे. यावरून लेखकपण ही त्यांच्या दृष्टीने काही स्वतंत्र महत्त्व असणारी बाब नव्हती असे दिसते आपल्या एकूण जीवनकार्याचाच एक भाग म्हणून ते स्वतःच्या साहित्यनिर्मितीकडे पाहत होते. देशकार्य आणि समाजकार्य हेच त्यांनी आपले जीवनध्येय मानलेले होते. या कार्याबाबत त्यांची निश्चित अशी आदर्शवादी भूमिका होती. आपल्या या जीवनकार्याला व ध्येयाला पूरक ठरणारी कृती म्हणूनच ते साहित्यनिर्मितीकडे पाहत होते. प्रत्यक्ष कृतीपेक्षा लिहिणे अथवा बोलणे ही दुय्यम कृती आहे असेच त्यांचे मत होते.”[२]

साहित्य निर्मितीला दुय्यम कृती जरी मानली तरी प्रत्यक्ष कृतीची पर्यायी कृती म्हणूनही साहित्याकडे पाहिले. जेव्हा त्यांची प्रत्यक्ष कृती कमी पडली त्यावेळी त्यांनी साहित्य निर्मिती केली. धडपडणारी मुले या कादंबरीच्या प्रस्तावनेत साने गुरुजी म्हणतात "माझ्यासारख्या दुबळ्या कृतीच्या माणसाच्या मनात खूप खळबळ असते, मनात मनोहर स्वप्ने असतात, मनात आशाआकांक्षा व उच्च ध्येये असतात; परंतु त्या सर्वांना कृतीत आणण्याचे धैर्य नसते. मग दौत, लेखणी, कागद घेऊन कल्पनांचे घोडे कागदावर नाचविणे एवढाच पुरुषार्थ वाटलो व तोच मी तुरुंगात करीत बसे"[३]

साहित्याला पर्यायी दृष्टिकोनाने पाहिल्यामुळे साहित्य निर्मिती म्हणजेच कला निर्मिती असे त्यांचे मत नसावे. पण याच्याच विपरीत कला निर्मिती म्हणून केली जाणारी वास्तवविन्मुख रंजक व कल्पनाविलासाने भरलेले साहित्यही त्यांना अमान्य होते.

## ४.३ साने गुरुजींच्या कादंबरीतील राजकीय भूमिका

सामाजिक व राजकीय प्रश्नांची कादंबरी या साहित्य प्रकाराचा अत्यंत सहज संबंध असतो ही गोष्ट लक्षात ठेवूनच साने गुरुजींच्या कादंबरीकडे पाहणे आवश्यक ठरते. वास्तवात जे राजकारण समाजासाठी असते त्यात मानवी गरजा आणि अपेक्षा कशा पूर्ण होतील याबद्दलचे चिंतन केले जाते. थोडक्यात राजकीय विचार मूलतः भविष्याकडे रोखलेला असतो.

राजकीय विचार अनेक असतात परंतु राजकीय विचारसरण म्हणत असताना त्यात तार्किक सुसंगती असणे आवश्यक असते. साने गुरुजींचा राजकीय विचार हा तत्कालीन समाजाच्या तडजोडीमधून आकाराला आला नसून तो भविष्याकडे रोखलेला होता. म्हणूनच साने गुरुजींचे राजकीय विचार हे परिस्थितीनुरूप बदलत गेले. ते कुठल्याही राजकीय विचारसरणीपुरते. मर्यादित राहिले नाहीत. किंबहुना मावूही शकले नाहीत. याच कारणामुळे साने गुरुजींची वैचारिक मते वेगवेगळ्या विचारसरणीच्या सीमारेषांवर वावरत होती. "कुणी म्हणत, साने गुरुजी हे पहिल्यापासूनच काँग्रेसचे आणि महात्मा गांधीचे भक्त होते. नंतर हळूहळू ते काँग्रेसचे कट्टर विरोधक झाले. पुढे ते कम्युनिस्टांच्या आहारी गेले. कुणी म्हणत, साने गुरुजी पूर्णपणे समाजवादी होते."[४] अर्थात याच कारणांमुळे विविध राजकीय विचारसरणीच्या लोकांनी साने गुरुजींवर आपला हक्क सांगितला असे हरिश्चंद्र थोरात यांचे मत आहे.

भारतीय स्वतंत्रलढ्याच्या वेळी गांधीयुगाचा आरंभ झाला. त्यावेळी साने गुरुजी महाविद्यालयीन विद्यार्थीदशेत होते. साने गुरुजींची राजकीय कारकीर्द १९३० पासून सुरु झाली. आणि याच काळात साने गुरुजींनी कादंबरी लेखनास प्रारंभ केला. महात्मा गांधीच्या प्रभावामुळे राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचायला लागली होती. काँग्रेस पक्ष शहरी उच्च वर्णीयत्वाचे सीमा ओलांडून खेड्यांकडे वळायला लागला होता. खुद्द महात्मा गांधींनी गावाकडे चला असे जाहीर केले होते. १९३६ या वर्षी झालेले काँग्रेसचे अधिवेशन खानदेशातील फैजपूर सारख्या ग्रामीण भागात आयोजित झाले होते. तर दुसरीकडे भारतात निर्माण होत असलेल्या औद्योगिक संस्कृतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा उर्वरित जगाशी संबंध येत होता. जागतिक मंदी आणि तेजी, आयात-निर्यात या सर्व गोष्टींचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पडत होता. याच पार्श्वभूमीवर भारतात अजून एक उपेक्षितांचा वर्ग निर्माण झाला तो म्हणजे कामगार वर्ग.

साने गुरुजींच्या राजकीय विचारांच्या केंद्रस्थानी फक्त ग्रामीण शेतकरी नव्हता तर सर्वसामान्य श्रमिक माणूस होता. श्रमिक माणसावर अन्याय होऊ नये, त्याला समाजात प्रतिष्ठेने जगता येईल अशी व्यवस्था व परिस्थिती निर्माण व्हावी हेच त्यांचे ध्येय होते. शेतकरी व कामगार ही काँग्रेस पक्षाची दोन फुफ्फुसे आहेत असे साने गुरुजींचे मत असले तरीही या श्रमिक वर्गाची हेळसांड काँग्रेस पक्ष करत आहे याची जाणीवही त्यांना होत होती. अशी परिस्थिती असताना अधिक जहाल असलेल्या कम्युनिस्ट चळवळीकडे साने गुरुजी आकर्षिले गेले. हे आकर्षण कितपत तीव्र स्वरूपाचे होते याचा प्रत्यय त्यांच्या कादंबरी लेखनातून येतो.

'संध्या' ही साने गुरुजींचे राजकीय विचार व्यक्त करणारी उत्तम कादंबरी आहे. ही कादंबरी १९४३ सालि प्रसिद्ध झाली असली तरीही या कादंबरीचे बहुतांश लेखन १९४१ मध्ये पूर्ण झाले होते. या कादंबरीतून साने गुरुजींवर पडलेला मार्क्सवादी प्रभाव सहजपणे जाणवतो. या कादंबरीतले 'विश्वास' व 'कल्याण' मार्क्सवादाचे समर्थन करताना दिसतात. याउलट 'भाईजी' हे पात्र शांत स्वभावाचे व गांधीवादाचे प्रवर्तक आहेत. भाईजींना काही प्रमाणात मार्क्सवादी विचार पटत असले तरीही मार्क्सवादाविषयी काही शंका त्यांच्या मनात आहे. 'कल्याण' मार्क्सवादाचा भारतीय तत्त्वज्ञानाशी संबंध जोडतो. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणेच मार्क्सवादी माणूस देखील मूळ गुन्हेगारी वृत्तीचा नाही असे त्याचे मत आहे . भाईजींना या पक्षाबद्दल काही प्रमाणात शंका वाटते. राजकीय कामासाठी त्या पक्षाला मदत जरी करीत असले तरीही आपण त्याच पक्षाचे म्हणून ते कधी पुढे येत नाहीत. या कादंबरीतील कल्याण व भाईजी ही दोन्ही पात्रे साने गुरुजींच्या राजकीय वैचारिकतेतील द्विधा मनस्थितीची रूपे आहेत.

पुढील दोन्ही संवादातून कल्याण व भाईजी यांचा स्वभाव व गुणधर्म समजतो.

**कल्याण :- "विश्वास, मी तुरुंगात पुष्कळ वाचलं. पुष्कळ ऐकलं. क्रांतीचा खंदा शिपाई व्हायचं मी ठरवलं. क्रांतीसाठी कामगार उठाव करीत आहेत, रस्त्यारस्त्यांतून लढत आहेत. त्यांच्या झेंड्याखाली मी लढत आहे. माझ्या रक्तानं मी लाल झेंडा रंगवीत आहे, अशी स्वप्नं मी रंगवीत असतो. ती स्वप्नं सत्यसृष्टीत आणायची मला तळमळ आहे. आणि विश्वास, तू कुठे चाललास वाहावत? तू का केवळ सुखासीन होणार? डोळ्यांवर पडदा ओढून बसणार? नाही, असं नाही होणार, हे धुकं जाईल. पुन्हा तू उभा राहशील, गरिबांसाठी उभा राहशील. आपण दोघे मित्र एकाच ध्येयाची पूजा करू. विश्वास, तू कॉलेजात शिकत आहे, हॉटेलात शिरा-पुरी खात आहेस, बोलपट बघत आहेस, परंतु ही परिस्थिती कितींना आहे? कोट्यवधी लोकांना पोटभर खायलाही नाही. दुसऱ्यांचा विचारच तुझ्याजवळ उरला नाही का? श्रमणाऱ्यांच्या जीवनाच्या होळ्या तुला का दिसतनाशा झाल्या?"** (संध्या पृ. ७८)

**विश्वास :- "भाईजी संक्रमणावस्थेत आहेत. ते म्हणतात, 'अमुक एका पक्षाचा शिक्का असा माझ्या कपाळावर नाही. सहानुभूती हा माझा धर्म. जिथं दुःख आहे, अन्याय आहे, जुलूम आहे. तिथं जावं, झगडावं, हे माझं ब्रीद.' ते धर्मशील आहेत. परंतु त्यांचा धर्म गंधभस्मांचा नाही. परमेश्वरावर त्यांची फार श्रद्धा आहे. ईश्वराचं नाव घेतील व सद्गदित होतील. परंतु त्यांचा धर्म दुबळा नाही. त्यांचा धर्म समाजवादी कार्यक्रमाच्या आड येत नाही. महर्षी सेनापती बापटांप्रमाणे ते म्हणतात, 'तुमच्या समाजसत्तावादाच्या पाठीमागे, तुमच्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाच्या पाठीमागे माझा एक श्रीहरी ठेवा म्हणजे झालं.' परंतु मला ते आवडले."** (संध्या पृ. १३४)

## ४.४ साने गुरुजींच्या कादंबरीतील सामाजिक विचार

साने गुरुजींनी आपल्या कादंबरीतून अनेक सामाजिक मुद्द्यांवरती प्रकाश टाकला आहे. भांडवलशाहीचा विरोध, समतेचे अधिष्ठान, जमीनदारीला विरोध या सर्व मुद्द्यांवर साने गुरुजींनी भर टाकला आहे. अर्थात आपल्या राजकीय व्यक्तिमत्वात सामाजिकतेवर भर दिल्यानंतर त्यांच्यावर असलेला कम्युनिस्ट विचारांचा प्रभाव काही प्रमाणात कमी झालेला दिसून येतो. नंतरच्या काळात साने गुरुजी कम्युनिस्ट पक्षावर टीका करताना सुद्धा दिसलेले आहेत. कम्युनिस्टवादी नैतिक मूल्यांना मानत नाहीत, ते संधी साधू राजकारण करतात, तसेच लोकशाहीवर त्यांची श्रद्धा नहीं अशी टीका कम्युनिस्ट लोकांवर केली. समाजातील आर्थिक विषमता कायद्यांच्या माध्यमातून दूर होऊ शकते परंतु इतर प्रकारच्या सामाजिक विषमता या फक्त जनतेच्या उत्कट प्रयत्नातूनच दूर होऊ शकतात असे साने गुरुजी मानू लागले.

भारतीय सर्वसामान्यांच्या हृदयात नैतिक अधिष्ठान निर्माण व्हावे यासाठी साने गुरुजींनी कादंबरी लेखन केले. साने गुरुजींच्या कादंबरीतून आदर्श समाज स्थापित करण्यासाठी आवश्यक असणारा ध्येयवादी दृष्टिकोन दिसतो. साने गुरुजींच्या 'नवा प्रयोग' या कादंबरीमध्ये आदर्श समाजाप्रती असलेली साने गुरुजींची ओढ अनेक वेळा व्यक्त झाली आहे. कादंबरीतील प्रमुख पात्रांना मोहनगाव या गावाला आदर्शगावामध्ये रूपांतरित करायचे आहे. भेदभाव करणाऱ्या, शोषण व अन्याय करणाऱ्या प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात जाऊन आदर्श समाज स्थापन करण्याचा प्रयत्न या कादंबरीत केला आहे. या कादंबरीतील आदर्श समाज स्थापु इच्छिणारे बहुतांशी सर्वच पात्रे ध्येयवादी आहेत. वास्तवातील समाजात वावरणाऱ्या मानवी मनाला असलेली परिमाणे अथवा त्यांच्यात असलेली विसंगती या

कादंबरीतील पात्रांमध्ये दिसत नाही. कुठल्या पात्राच्या मनात खोटेपणा आहे ना त्यांना कोणाबद्दल शंका  वाटते. प्रत्येक पात्राचा स्वभाव पूर्णतः पारदर्शक आहे. ही पात्रे फक्त साने गुरुजींचेच विचार प्रकट करण्यासाठी जन्माला आली आहेत.

स्वातंत्र्य म्हणजे फक्त राजकीय गुलामगिरी पासून मुक्ती नाही तर सामाजिक गुलामगिरी सुद्धा नष्ट होणे असे साने गुरुजींचे मत. त्यांच्या कादंबरीतून स्पष्टपणे समजते. इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीपेक्षा आपल्या समाजातील स्त्रियांची गुलामगिरी, मजुरांची गुलामगिरी, हरिजनांची गुलामगिरी साने गुरुजींना अधिक संतापदायक वाटते. म्हणूनच साने गुरुजींच्या स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनात सामाजिक स्वातंत्र्याला अधिक प्रमाणात महत्त्व होते. हेच सामाजिक स्वातंत्र्य साने गुरुजींच्या आदर्श भारतीय समाजाचा पाया आहे. ‘नवा प्रयोग’ या कादंबरी शिवाय ‘धडपडणारी मुले’ व ‘क्रांती’ या कादंबऱ्यातून सुद्धा साने गुरुजींच्या आदर्श समाजाची कल्पना ठळकपणे उमटते.

‘धडपडणारी मुले’ या कादंबरीतील चळवळीचे चित्रण वास्तववादी आहे. साने गुरुजींना अभिप्रेत असलेला ध्येयवादी दृष्टिकोन या कादंबरीला प्राप्त झाला आहे. शिक्षण प्रसार जनप्रबोधन खादीचा प्रसार ग्रामसफाई ग्रामोद्योग यासारखे कार्य करून साने गुरुजींनी तरुण पिढीच्या हातून एक सामाजिक चळवळ सुरू केली आहे. ‘धडपडणाऱरी मुले‘मध्ये ‘स्वामीजी: तर ‘क्रांती’मध्ये ‘मुकुंदराव’ यासारखी पात्रे तरुण पिढीला नवविचारांचे मार्गदर्शन करण्याचे काम करतात.

साने गुरुजींच्या कादंबरीतील सामाजिक आशयाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्री विषयक समस्या आणि स्त्री सशक्तिकरण. एकूणच भारतीय समाज रचनेत स्त्रियांना खूप हाल अपेष्टांचे जीवन जगावे लागते. पारंपारिक हिंदू समाज व्यवस्थेत स्त्रियांचे शारीरिक आणि मानसिक शोषण होते. याचेच प्रत्ययकारी चित्रण साने गुरुजींनी ‘सती’ या

कादंबरीत केले आहे. 'मैना' ह्या पात्राच्या रूपाने सती जाणाऱ्या स्त्रीची प्रातिनिधिक कहाणी कादंबरीतून सांगितलेली आहे. पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या हिंदू विवाह संस्थेतील सामाजिक रुधीवरीसाने गुरुजींनी टीका केली आहे.

स्त्रियांनी फक्त शोषित आयुष्य जगावे असे साने गुरुजींना वाटत नाही तर साने गुरुजींना अभिप्रेत असलेल्या आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचेही योगदान अपेक्षित आहे. म्हणूनच साने गुरुजींनी आपल्या कादंबरीतून ध्येयवादी स्त्री पात्रेही निर्माण केली.

## ४.५ समारोप

प्रस्तुत प्रकरणात साने गुरुजींच्या कादंबरीतून प्रकट होणारी वैचारिकता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. साने गुरुजींचे विचार व त्यांचे कादंबरी लेखन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साने गुरुजींनी फक्त मनोरंजनासाठी कादंबरी लेखन केले नाही तर आपल्या विचारांचे प्रतिपादन करण्यासाठी लेखन केले हे समजून घेण्यासाठी त्यांच्या साहित्य निर्मिती विषयक दृष्टिकोन समजून घेतला आहे. साने गुरुजींनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कादंबरी लेखन केले. त्यांनी आपल्या कादंबरीच्या माध्यमातून आपले सामाजिक व राजकीय भूमिका स्पष्ट केली आहे. साने गुरुजी काँग्रेसचे कार्यकर्ते होते किंबहुना त्यांच्यावर गांधीवादाचा असलेल्या प्रभाव त्यांच्या कादंबरीतून प्रकट होतो. परंतु परिस्थितीनुरूप त्यांची राजकीय भूमिका बदलताना दिसते. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर साम्यवादी विचारांचा प्रभाव दिसतो.

साने गुरुजींनी आपल्या कादंबऱ्यांतून अनेक सामाजिक मुद्द्यांवर भाष्य केले आहे. सामाजिक विषमता दूर होण्यासाठी त्यांनी कादंबरी लेखन केले. आपल्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेले असलेले आदर्श समाजाची कल्पना त्यांनी मांडली आहे.

## ४.६ निष्कर्ष

- साने गुरुजींचे कादंबरी लेखन हे त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा एक भाग आहे परंतु प्रत्यक्ष कार्यापेक्षा साहित्य निर्मितीला त्यांनी दुय्यम मानले आहे.
- साने गुरुजींच्या राजकीय विचारांच्या केंद्रस्थानी सर्वसामान्य श्रमिक माणूस आहे.
- साने गुरुजींच्या राजकीय कादंबरीतून गांधीवाद व साम्यवाद यांच्यातील द्वंद्व स्पष्ट होते.
- साने गुरुजींचा राजकीय विचार एकच एक राजकीय विचारसरणीत मावत नाही तर परिस्थितीनुरूप साने गुरुजींची राजकीय भूमिका बदलताना दिसते.
- साने गुरुजींनी राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरीला अधिक चिंताजनक मानले आहे.
- साने गुरुजींच्या कादंबऱ्यातून साने गुरुजींची आदर्श समाजाकडे असलेली ओढ व्यक्त होते.
- आदर्श समाजातील सर्व पात्रे वास्तवविन्मुख वाटतात. वास्तवातील मानवी मनाला असलेली परिमाणे या पात्रांना नाहीत.
- सामाजिक आर्थिक व धार्मिक या तीनही प्रकारचे भेद दूर करण्यासाठी साने गुरुजींनी कादंबरी लेखन केले आहे.

- खादी प्रसार व प्रचार फक्त राष्ट्रीय चळवळीचा भाग म्हणून नाही तर आर्थिक विषमता दूर करण्यासाठी महत्त्वाची मानला आहे.
- ग्रामसफाई, शिक्षण प्रचार, जनप्रबोधन, ग्रामोद्योग यासारखे सामाजिक कार्य करणारी पात्रे साने गुरुजींच्या सामाजिक कादंबऱ्यांमध्ये आली आहेत.

## ४.७ संदर्भसूची

### संदर्भ

[१] सावंत वासुदेव. साने गुरुजी पुनर्मूल्यांकन (संपा. नेमाडे भालचंद्र), साहित्य अकादमी प्रकाश, २०१४. पृ.९२

[२] सावंत वासुदेव. साने गुरुजी पुनर्मूल्यांकन (संपा. नेमाडे भालचंद्र), साहित्य अकादमी प्रकाश, २०१४. पृ.९२

[३] सावंत वासुदेव. साने गुरुजी पुनर्मूल्यांकन (संपा. नेमाडे भालचंद्र), साहित्य अकादमी प्रकाश, २०१४. पृ.९३

[४] गोडबोले अनिल. साने गुरुजी जीवन, साहित्य आणि विचार, उन्मेष प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली १९९६. पृ. १३५

कामत अशोक. धडपडणाऱ्या मुलांची आई साने गुरुजी, ओंकार प्रकाशन, पोस्टाजवळ, धनकवाडी, पुणे

भगत रा. तू., साने गुरुजी गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, साकोली कॉर्नर, कोल्हापूर, १९९९

दयाराम पाटील, साने गुरुजी: समग्र वाङ्मय दर्शन, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, १९९९

दिघे बाळासाहेब मनोहर, 'साने गुरुजी यांचे कादंबरी लेखन एक अभ्यास', संशोधन प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, २०११

## आधार ग्रंथ

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सहा सती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : आठ संध्या, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : दहा सोन्या मारुती आणि दीनबंधू, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : अकरा क्रांती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : बारा गोड शेवट, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : तेरा रामाचा शेला, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : चौदावा चित्रकार रंगा आणि नवा प्रयोग, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : पंधरा धडपडणारी मुले, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सतरा पुनर्जन्म, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११

## प्रकरण : ५

# समारोप व निष्कर्ष

**अनुक्रमणिका**

५.१ समारोप ........................................................................................................ 84

५.२ निष्कर्ष........................................................................................................... 86

## ५.१ समारोप

'साने गुरुजी यांच्या निब्दक कादंबऱ्यांचा अभ्यास' या शोध प्रबंधीकेतील अभ्यास हा साने गुरुजी या विशिष्ट लेखकाचा अभ्यास असल्यामुळे पहिल्या प्रकरणात विशिष्ट लेखकाचा अभ्यास करण्यासाठी लागणाऱ्या सैद्धांतिक मांडणीचा अभ्यास केला आहे. तत्कालीन समाज काल व परिस्थितीचा त्याच्यावर आणि त्याच्या साहित्यावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करावा लागतो. लेखकाच्या ठाई असलेल्या वैचारिक मुल्यांचा त्याच्या साहित्यावर प्रभाव पडत असतो. साहित्यइतिहासात लेखकाचे स्थान निश्चित करणे हे ह्या अभ्यासामागचे प्रयोजन असू शकते.

ह्या प्रबंधीकेत साने गुरुजी यांच्या निवडक कादंबऱ्यांचाच अभ्यास होत असल्याने दुसऱ्या प्रकरणात कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप, संकल्पना ह्या कादंबरीच्या सिद्धांतिक भागाचा अभ्यास केला आहे. कादंबरी या संकल्पनेचा विचार करून एक वाङ्मयप्रकार म्हणून तिचे काय निकष आहेत ते जाणून घेतले आहे. अव्वल इंग्रजी काळात कादंबरीची सुरुवात पाश्चात्य साहित्यात सुरुवात झाली. मानवाच्या जीवनाशी निगडित असलेल्या या वाङ्मयप्रकारात वास्तवाचा व कल्पनेचा मेळ साधून कलात्मक अभिव्यक्तीने लेखन केलेले असते. कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, निवेदन व वातावरण ह्या पाचही घटकातून कादंबरीचे स्वरूप सिद्ध होत असते. आशय व अभिव्यक्ती दृष्ट्या कादंबरीचे विविध प्रकार पाडता येतात. मराठीत सर्वात आधी सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक कादंबरीचे प्रकार उदयाला आले. बदलत्या काळाप्रमाणे इतरही कादंबरीचे प्रकार प्रचलीत झाले. अभीव्यक्तिदृष्ट्या चरित्रात्मक व आत्मचरित्रात्मक कादंबरी असे प्रकार पाडता येतात.

तिसऱ्या प्रकरणात साने गुरुजींच्या निवडक अकरा कादंबऱ्यांची कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, निवेदन पद्धती व वातावरण ह्या कादंबरीच्या पाचही घटकांच्या आधारावर वेगवेगळी चिकित्सा केली आहे. साने गुरुजींच्या सामाजिक व

राजकीय कादंबऱ्यांचा विचार करत असताना लेखकाने तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडविले आहे हे समजते. साने गुरुजींच्या साने गुरुजींच्या कादंबरीतील पात्रे ही फक्त कथानकाचा भाग म्हणून नाही तर काहीतरी मूल्यभाव अंगी घेऊन आली आहेत. कादंबरीच्या भाषेत प्रेमाचा अनुबंध आहे. त्यात हळवेपणा आहे. साने गुरुजींची कादंबरी लेखनातून समाजात परिवर्तन आणण्याची असलेली तळमळ स्पष्ट होते. सुटसुटीत भाषेमुळे निवेदन व वातावरण निर्मितीही प्रभावीपणे झालेली आहे.

प्रबंधीकेच्या चौथ्या  प्रकरणात साने गुरुजींच्या कादंबरीतून प्रकट होणारी वैचारिकता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. साने गुरुजींचे विचार व त्यांचे कादंबरी लेखन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साने गुरुजींनी फक्त मनोरंजनासाठी कादंबरी लेखन केले नाही तर आपल्या विचारांचे प्रतिपादन करण्यासाठी लेखन केले हे समजून घेण्यासाठी त्यांच्या साहित्य निर्मिती विषयक दृष्टिकोन समजून घेतला आहे. साने गुरुजींनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कादंबरी लेखन केले. त्यांनी आपल्या कादंबरीच्या माध्यमातून आपले सामाजिक व राजकीय भूमिका स्पष्ट केली आहे. साने गुरुजी काँग्रेसचे कार्यकर्ते होते किंबहुना त्यांच्यावर गांधीवादाचा असलेल्या प्रभाव त्यांच्या कादंबरीतून प्रकट होतो. परंतु परिस्थितीनुरूप त्यांची राजकीय भूमिका बदलताना दिसते. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर साम्यवादी विचारांचा प्रभाव दिसतो. साने गुरुजींनी आपल्या कादंबऱ्यांतून अनेक सामाजिक मुद्द्यांवर भाष्य केले आहे. सामाजिक विषमता दूर होण्यासाठी त्यांनी कादंबरी लेखन केले. आपल्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेले असलेले आदर्श समाजाची कल्पना त्यांनी मांडली आहे.

एकूण अभ्यासावरून हे सिद्ध होते कि साने गुरुजींनी प्रस्थापित साहित्याप्रहावाच्या विपरीत कादंबरी लेखन करून मराठी कादंबरीला एक वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन वास्तव परिस्थितीचे वर्णन त्यांनी आपल्या कादंबरीतून

केले. परंतु जमाजात होणारा चांगला बदल त्यांनी आपल्या कादंबरीतून दाखवला तो काही प्रमाणात काल्पनिक व कृत्रिम वाटतो. पुरुषाप्रमाणे स्त्रीलाही गुरुजींनी सामाजिक व राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी महत्वाचे मानले आहे. म्हणूनच साने गुरुजींच्या कादंबरीतील स्त्रियाही  शूर व धाडसी आहेत. साने गुरुजींचे कादंबरी लेखन हे फक्त सीतय नसून त्यांच्या मनाचा आरसा आहे. समाजाप्रती असलेली तळमळ ह्या कादंबऱ्यांत सामावलेली आहे.

## ५.२ निष्कर्ष

- विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा साहित्य अभ्यासातील महत्त्वाचा संशोधन विषय आहे
- लेखक आपल्या व्यक्तिगत जीवनाला साहित्य लेखानापासून वेगळे होऊ शकत नाही. व्यक्तीगत आयुष्याचे पडसाद कमी जास्त प्रमाणात साहित्यातून उमटत असतात.
- विशिष्ट लेखकाच्या अभ्यासांतर्गत लेखकाचे जीवनचरित्र आणि त्याचे साहित्य या दोन्ही घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.
- लेखकाच्या जीवन चरित्राचा अभ्यास करताना तत्कालीन समाज, संस्कृती, राजकारण इत्यादि महत्त्वाच्या घटकांचाही अभ्यास करावा लागतो.
- लेखकाच्या अभ्यासाला वाङ्मय इतिहास आणि लेखकाने हाताळलेल्या साहित्यप्रकारांचे सांकल्पनिक माहितीचे भान असावे लागते.

- कादंबरी ह्या साहित्यप्रकाराचे निश्चित व्याख्या करणे कठीण आहे परंतु तिचे स्वरूप हे विस्तृत असते व मनुष्य जीवन व समाज कादंबरीचा आत्मा असतो असे म्हणता येते.
- कादंबरीचे घटक निश्चितपणे सांगता येतात ज्यांतूनच कादंबरीला स्वरूप प्राप्त होत असते.
- कादंबरी ही तत्कालीन समाज वास्तवाचा आरसा असते.
- कुठलीही कादंबरी ही एखाद्या कथा तत्वावर आधारित असते व ही कथा तत्व वास्तव व कल्पना यांच्या मिश्रणातून साध्य होत असते.
- कादंबरी हा ललित वाङ्मयप्रकार आधुनिक गध्यात्मक साहित्यप्रकार आहे.
- साने गुरुजींनी समाजाकडे डोळसपणे पाहून कादंबरी लेखन केले आहे.
- साने गुरुजींनी कादंबरीच्या माध्यमातून आपल्या स्वप्नातील नवभारत अथवा आदर्श भारत वास्तवात येण्यासाठी प्रयत्न केला आहे.
- साने गुरुजींच्या कादंबऱ्या स्त्री मनाचा सूक्ष्मपणे वेध घेतात व स्त्रियांच्या समस्याही मांडतात.
- कादंबरीतून साने गुरुजींचे खादी व स्वदेशी प्रती असलेले प्रेम व निष्ठा स्पष्ट होते.
- कादंबरीच्या कथानकात व पात्रांमध्ये वैविध्य दिसत नाही.
- समाजातील अज्ञानता असाह्यता अन्याय असाक्षरता वाईट चालीरीती अशा प्रकारच्या सामाजिक विषमता दूर करण्यासाठी कादंबरीतील पात्रे आली आहेत.
- साने गुरुजींच्या कादंबरीत विस्मय संघर्ष चमत्कारिक कलाटने आदी प्रयोग झालेले नाहीत. मनोरंजनाच्या हेतूने वाचन करत असताना कादंबरी रटाळ वाटू शकते.

- सरळ सूट कथानकातून कादंबरीचा आशय व्यक्त झाला आहे.
- समाजातील सर्व स्तरातील लोकांना कादंबरीचे स्थान प्राप्त झाले आहे.
- कादंबरीत काही प्रमाणात खलपात्रे आलेले आहेत परंतु परिस्थितीनुरूप त्यांच्यातही बदल होतो.
- साने गुरुजींच्या कादंबरीची भाषा आशयाशी एकरूप झालेली आहे.
- कादंबरीचे निवेदन प्रासादिक भाषेत केले आहे.
- वातावरण निर्मितीतून आणि काही प्रमाणात निसर्ग वर्णनातून आशयाला उठवदार बनवण्याचा प्रयत्न केला आहे.
- कादंबरीच्या एकंदरीत स्वरूपावरून लेखकाच्या ठायी असलेला भाबडेपणा व  कष्टी समाजाप्रती असलेली तळमळ स्पष्ट होते.
- साने गुरुजींचे कादंबरी लेखन हे त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा एक भाग आहे परंतु प्रत्यक्ष कार्यापेक्षा साहित्य निर्मितीला त्यांनी दुय्यम मानले आहे.
- साने गुरुजींच्या राजकीय विचारांच्या केंद्रस्थानी सर्वसामान्य श्रमिक माणूस आहे.
- साने गुरुजींच्या राजकीय कादंबरीतून गांधीवाद व साम्यवाद यांच्यातील द्वंद्व स्पष्ट होते.
- साने गुरुजींचा राजकीय विचार एकच एक राजकीय विचारसरणीत मावत नाही तर परिस्थितीनुरूप साने गुरुजींची राजकीय भूमिका बदलताना दिसते.
- साने गुरुजींनी राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरीला अधिक चिंताजनक मानले आहे.
- साने गुरुजींच्या कादंबऱ्यातून साने गुरुजींची आदर्श समाजाकडे असलेली ओढ व्यक्त होते.

- आदर्श समाजातील सर्व पात्रे वास्तवविन्मुख वाटतात. वास्तवातील मानवी मनाला असलेली परिमाणे या पात्रांना नाहीत.
- सामाजिक आर्थिक व धार्मिक या तीनही प्रकारचे भेद दूर करण्यासाठी साने गुरुजींनी कादंबरी लेखन केले आहे.
- खादी प्रसार व प्रचार फक्त राष्ट्रीय चळवळीचा भाग म्हणून नाही तर आर्थिक विषमता दूर करण्यासाठी महत्त्वाची मानला आहे.
- ग्रामसफाई, शिक्षण प्रचार, जनप्रबोधन ग्रामोद्योग यासारखे सामाजिक कार्य करणारी पात्रे साने गुरुजींच्या सामाजिक कादंबऱ्यांमध्ये आली आहेत.

# संदर्भसूची

## संदर्भ ग्रंथ


1. कवठेकर बाळकृष्ण. साहित्याचा अभ्यास गुरुवर्य डॉ. र. बा. मंचरकर सद्भावः ग्रंथ (संपा. समिति : जोशी चं. वि., उपाध्ये बाबुराव, देशमुख लता, ढोणे एकनाथ, शेंडगे बाबासाहेब, वडमारे राजेंद्रकुमार, पवार संतोष पद्माकर, गंधारे दत्तात्रय, राऊत रामचंद्र, चंद्रकांत रुद्राक्षे) अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन पहिली आवृत्ती २००३
2. कराड सर. संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती, (संपा.  शेळके भास्कर), प्रकाशकः तारादेवी भास्कर शेळके पुणे. पहिली आवृत्ती, २०१३
3. कोत्तापल्ले नागनाथ. मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा (संपा : आवलगांवकर अविनाश), अरुण पालगांवकर प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, पहिली आवृत्ती २००६
4. निरगूडकर भारती. संशोधनपाथेय डॉ. भास्कर गिरिधारी गौरव ग्रंथ, (संपा: डॉ. धनाजी गुरव), शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१३
5. पवार लता. संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती, (संपा. शेळके भास्कर), प्रकाशकः तारादेवी भास्कर शेळके पुणे. पहिली आवृत्ती, २०१३
6. सानप किशोर. संशोधनपाथेय डॉ. भास्कर गिरिधारी गौरव ग्रंथ, (संपा: डॉ. धनाजी गुरव), शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१३

7. मुखर्जी, मीनाक्षी. तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा (संपा. जहागीरदार चंद्रशेखर), सौरभ प्रकाशन कोल्हापूर. आवृत्ती पहिली १९९२.

8. प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले. मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन पुणे. आवृत्ती तिसरी १९७६.

9. नेमाडे भालचंद्र. टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन औरंगाबाद. १९९०.

10. हस्तक उषा. साहित्यः अध्यापन आणि प्रकार, मौज प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली, १९८७

11. अमरनाथ. हिंदी आलोचना की परिभाषिक शब्दावली, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, आवृत्ती दुसरी , २०१२,

12. उपाध्ये बाबुराव दत्तात्रय, मराठी वाङ्मयप्रकार, संकल्पना व वाटचाल (संपा. गंधारे द. के.) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर. आवृत्ती पहिली २०१७.

13. गिंडे वा.पु.. साहित्य आस्वाद, अध्यापन आणि समीक्षा (संपा. बडवे सतीश), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पहिली आवृत्ती २०१३

14. ठाकूर रवींद्र. साहित्य : समीक्षा आणि संवाद, प्रकाशक राजीव दत्तात्रय बर्वे, दिलीपराज पुणे. प्रकाशनदुसरी आवृत्ती २०१४

15. सावंत वासुदेव. साने गुरुजी पुनर्मूल्यांकन (संपा. नेमाडे भालचंद्र), साहित्य अकादमी प्रकाश, २०१४.

16. गोडबोले अनिल. साने गुरुजी जीवन, साहित्य आणि विचार, उन्मेष प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली १९९६. पृ.

17. कामत अशोक. धडपडणाऱ्या मुलांची आई साने गुरुजी, ओंकार प्रकाशन, पोस्टाजवळ, धनकवाडी, पुणे

18. भगत रा. तू., साने गुरुजी गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, साकोली कॉर्नर, कोल्हापूर, १९९९

19. दयाराम पाटील, साने गुरुजी: समग्र वाङ्मय दर्शन, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, १९९९

20. दिघे बाळासाहेब मनोहर, ‘साने गुरुजी यांचे कादंबरी लेखन एक अभ्यास’, संशोधन प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, २०११

## आधार ग्रंथ

- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सहा सती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : आठ संध्या, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : दहा सोन्या मारुती आणि दीनबंधू, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : अकरा क्रांती, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : बारा गोड शेवट, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : तेरा रामाचा शेला, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : चौदावा चित्रकार रंगा आणि नवा प्रयोग, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : पंधरा  धडपडणारी मुले, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११
- साने गुरुजी. संपूर्ण साने गुरुजी खंड : सतरा पुनर्जन्म, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. आवृत्ती पहिली २०११